प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ____________________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात श्री.भास्कर शिंदे (कार्यालयीन अधिक्षक) यांच्या सेवानिवृत्ती निमित्त गौरव सोहळा संपन्न

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय,जालना येथे दि.18/06/2021 रोजी श्री.भास्कर शिंदे (कार्यालयीन अधिक्षक) यांच्या सेवानिवृत्ती निमित्त गौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके, प्रमूख पाहुणे श्री.अर्जून भाबड, प्रा.डॉ.शोभा यशवंते, प्रा.रामनाथ पालवे यांची उपस्थिती होती.

प्रारंभी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच सत्कारमूर्ती श्री.भास्कर शिंदे यांचा सपत्नीक शाल-श्रीफळ व पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे प्रा.रामनाथ पालवे म्हणाले की, माणुस कतृत्वाने मोठा होतो. शिंदे सरांचे कतृत्व मोठे आहे. महाविदयालयामध्ये सरांचा सिंहाचा वाटा आहे. सरांनी विविध प्रकारचे चांगले कार्य केलेले आहे. त्यामुळे त्यांची जालना शहरात चांगल्या प्रकारे ओळख झालेली आहे. तसेच प्रा.डॉ.शोभा यशवंते यांनी श्री.शिंदे सरांबददल विचार व्यक्त करतांना म्हटले की, ज्ञान,बल,फुल या गोष्टीचा अहंकार व्यक्तीला असतो. पण श्री.शिंदे सर यांनी निरपेक्ष पणे काम केलेले आहे. कधीही कामाची कुचराई केलेली नाही. शिंदे सर यांचे महाविदयालयासाठी मोठे योगदान आहे. असे मत व्यक्त केले.

श्री.अर्जुन भाबड सर यांनी सांगितले की, महाविदयालयामध्ये श्री.शिंदे सर यांच्या सोबत आम्ही सुरुवातीपासून प्रशासनातील विविध कामे केली तो अनुभव आमच्यासाठी प्रेरणा देणाराच ठरतो असे मत व्यक्त केले आहे.

यावेळी सत्कारमूर्ती श्री.भास्कर शिंदे सर (कार्यालयीन अधिक्षक) यांनी सत्काराला उत्तर देतांना म्हटले की, माणसाने आरसा होवून जगलं पाहीजे. व्देष भावनेतून केलेले काम कधीही चांगले होवू शकत नाही. तसेच महाविदयालयामधून मी जरी सेवानिवृत्त झालो असलो तरी मला महाविदयालयाची कायम आठवण येत राहणार आहे. मी डबक्या सारखं जीवन कधीच जगणार नाही मी सतत प्रवाही राहणार व आजही मला सेवानिवृत्त झाल्यासारखे वाटत नाही मी सतत याही पुढे माझे कार्य करित राहणार आहे असे मत व्यक्त केले. यावेळी अनेक कर्मचारी यांनी मनोगत व्यक्त केले आहेत.

या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके यांनी म्हटले की, श्री.भास्कर शिंदे (कार्यालयीन अधिक्षक) यांनी महाविदयालयाच्या सुरुवातीपासून भौतिक सुविधा, महाविदयालयातील प्रशासकीय कामकाज अतिशय काळजीपूर्वक केले. याच बरोबर महाविदयालय स्तरावर कार्य करित असतांना श्री. शिंदे सर यांनी समाजामध्ये सुध्दा चांगल्या प्रकारे कार्य केले आहे. त्यामुळे त्यांची चांगली ओळख निर्माण झाली आहे.

तसेच महाविदयालयातील कुठलीही समस्या योग्य पध्दतीनुसार सोडवूण महाविदयालयाचा विकास करण्याचे काम त्यांनी केलेले आहे. विशेषत: प्राचार्य व अधिक्षक यांच्या संवादामुळे महाविदयालयाला चांगली ओळख निर्माण झाली असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.गौतम वाकळे यांनी मानले या कार्यक्रमास प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्त्र कर्मचारी यांची उपस्थिती होती.

प्राचार्या

डॉ. सुनंदा तिडके

PRINCIPAL

Rashtramata Indira Gandhi Arts

Science & Commerce College, Jalna

दिनांक :- 26/06/2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ____________________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय,जालना येथे दि.26/06/2021 रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती 'समाजिक न्यायदिन' म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी प्रारंभी राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके, प्रमूख पाहुणे प्रा.डॉ.शोभा यशवंते यांनी अर्पण केला.

यावेळी प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.शोभा यशवंते मॅडम म्हणाल्या की, राजर्षी शाहू महाराज यांची प्रगतशील राजा म्हणून ओळख आहे. राजर्षी शाहू महाराज यांनी सर्वांना प्राथमिक शिक्षण मोफत देण्याचे कार्य केले. तसेच समाजातील जातीभेद नष्ट करण्याचे मोठे काम त्यांनी केले. त्याचबरोबर सर्वसामान्य लोकांच्या मनातील लोककल्याणकारी राजा म्हणून गोरगरीबांसाठी सतत परिश्रम घेत राहिले असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके यांनी म्हटले की, राजर्षी शाहू महाराज यांनी सामाजिक न्याय या दृष्टीकोणातून अतिशय महत्वाचे काम केले. तसेच सर्व जाती धर्मासाठी वेगवेगळी वसतीगृह काढली व त्यांना प्रेरणा देण्याचे कार्य केले. विशेषत: सर्व समाजासाठी आरक्षणाचे काम त्यांनी केले त्यामुळे त्यांना आरक्षणाचे जनक म्हणून ओळखले जाते. समाजामध्ये राजर्षी शाहू महाराज यांनी गोरगरीब दीन दलित व इतर सर्वांसाठी विविध कामे करुन दिशा दाखविण्याचे कार्य मोठे केले आहे. तसेच कोल्हापूर,सोलापूर, सातारा या परिसरामध्ये वसतीगृह, शैक्षणिक कार्य,धरण,बंधारे निर्माण करुन आदर्श उभा केला असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.सचिन जयस्वाल यांनी केले तर आभार प्रा.डॉ.प्रमोद चव्हाण यांनी मानले या कार्यक्रमास प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

प्राचार्या

PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

दि: ०१/०७/२०२४

[illegible]

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात स्व. वसंतराव नाईक यांची जयंती साजरी

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरागांधी महाविद्यालय, जालना येथे दि. ०१/०७/२०२४
रोजी स्व. वसंतराव नाईक यांची जयंती कृषि दिन म्हणून साजरी करण्यात
आली यावेळी प्रारंभी स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस कार्यक्रमाचे
अध्यक्ष मा. डॉ. नारायणरावजी मुंढे (संस्थापक/अध्यक्ष भगवान शिक्षण
प्रसारक मंडळ, गेवराई) प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. सोपान चव्हाण, डॉ. ज्योती
धर्माधिकारी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. सोपान चव्हाण
यांनी आपले विचार व्यक्त करताना म्हटले की माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव
नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी केली जाते ही आनंदाची बाब
आहे. तसेच स्व. वसंतराव नाईक यांनी शेतकरी वर्गासाठी आपण
काही तरी देणं लागतो या हेतूने कार्य केले पाहिजे. त्यामुळे गोरगरीब
दलित या मागासांकरिता कार्य करावे असे मत व्यक्त केले. बी. बियाणे इ. कामान
याचबरोबर महाराष्ट्र राज्यामध्ये वृक्षारोपण लागवड,
उल्लेखनीय काम करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून स्व. वसंतराव नाईक
यांनी मोठे कार्य केले आहे.

या कार्यक्रम प्रसंगी मनोगतपर विचार प्रा. डॉ. गिर्हे दादासाहेब
प्रा. डॉ. प्रमोद चव्हाण, प्रा. डॉ. ज्योती धर्माधिकारी मॅडम इ. यांनी व्यक्त केले.
या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. नारायणरावजी मुंढे
यांनी म्हटले की स्व. वसंतराव नाईक यांनी ग्रामीण भागातील लोकांच्या
समस्या व दूर शेतकऱ्याचे प्रश्न या बाबीचा विचार करून जनतेसा.
उदा- शेतकऱ्याच्या अडचणी, बी. बियाणे, हायब्रीड इ. गोष्टीचे कार्य
अतिशय चांगले केले तसेच राज्यामध्ये अन्न धान्य मी कमी पडू देणार
नाही ही प्रतिज्ञा केली व त्याप्रमाणे कार्य पण केले. [illegible] पक्षाशी
तडजोड करून आदर्श निर्माण केला. तसेच महाराष्ट्रात कृषी विद्यापीठ
मिळाले पाहिजे ही मागणी असताना (एकूण) ०४ कृषि विद्यापीठ महाराष्ट्र
मिळवून दिले व स्थापन केले असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे
सूत्रसंचालन प्रा. सचिन जयस्वाल यांनी केले व आभार प्रा. लहुराव दराडे
यांनी मानले या कार्यक्रमास प्राध्यापकवृंद शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

करिता/- [signature]

Rashtr... ata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jaln

दिनांक :- 22/07/2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ________________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## ओबीसी, व्हीजे एन.टी. जनजागृती अभियानाची
## क्रांतीची मशाल पेटवून मंडल स्तंभावरुन उत्साहात सुरुवात

अंबड तालूक्यातील मौजे दोदडगांव येथील देशातील प्रथम मंडल स्तंभास दिनांक 22.07.2021 रोजी ओबीसी व्हीजे एन.टी. सन्माननीय प्रतिक असलेल्या मंडल स्तंभास प्रारंभी क्रांतीची मशाल पेटवून व पुजन करुन मा.आ.डॉ.नारायणराव मुंढे (देशातील प्रथम मंडल स्तंभ निर्माते) मा.बबनराव तायवाडे (मागासवर्गीय अयोगाचे सदस्य) श्री.रामराव वडकुते (माजी आमदार) मा.श्री.राजेशजी राठोड (आमदार) श्री.बाळासाहेब शिंदे, मा.श्री.बाळासाहेब सानप, मा.श्री.अरुण खरमाटे (ओबीसी नेते) दलित मित्र श्री.बाबूराव मामा सतकर, कार्यक्रमाचे संयोजक मा.प्रा.सत्संग नारायणराव मुंढे, श्री.शरद कोळी,श्री.राहूल जाधवर, श्री.नवनाथ पडळकर, श्री.सोमनाथ काशीद, श्री.ओमप्रकाश चितळकर, श्री.दादासाहेब काळे, श्री.अशोक तारडे, डॉ.शाम पांढरे, श्री.विजय खटके, श्री.सचिन राठोड, श्री.रामजी खुरांगे, श्री.बंडुशेट मुंढे इत्यादी मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमानिमित्त प्रमूख मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख उपस्थिती मा.श्री.बबनराव तायवाडे यांनी म्हटले की, देशातील ओबीसी हा जागृत होवून मंडल स्तंभाचे दर्शन झाले पाहीजे तेव्हाच नवचैतन्य, नवनिर्मिती तयार होईल. तसेच मा.आ.डॉ.नारायणराव मुंढे यांनी मंडल स्तंभाची स्थापना करुन जे कार्य केले त्यामुळेच ओबीसी कार्यकर्त्यांना चांगली प्रेरणा मिळाली आहे. श्री.बाळासाहेब शिंदे यांनी सांगितले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भिमा कोरेगांव या ठिकाणी प्रथमत: सलामी दिली. त्या ठिकाणी आपण सर्व ओबीसी यांनी गेले पाहीजे. तसेच ओबीसी जनजागरण अभियान राबविले पाहीजे असे मत व्यक्त केले. या प्रसंगी श्री.बाळासाहेब सानप यांनी म्हटले की, ओबीसी चळवळ चांगली उभी राहत आहे यामध्ये सर्वांनी सहभागी होणे गरजेचे आहे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने मा.श्री.रामराव वडकुते यांनी आपले मत व्यक्त करतांना विचार मांडले की, ओबीसी चळवळ ही राज्यभर चांगल्या पध्दतीने चालू झाली आहे. परंतू ओबीसी कार्यकर्त्यांनी ही चळवळ अभ्यास करुन पुढे नेली पाहीजे. तसेच प्रत्येक कार्यकर्त्यांनी पहिला मी ओबीसीसाठी, नंतर पक्षासाठी असे ठरविणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.

तसेच मा.आ.श्री.राजेशजी राठोड यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मी जालना जिल्हयाचा रहिवासी आहे तेथे मंडल स्तंभ आहे याचा सार्थ मला अभिमान आहे. विशेषत: मंडल स्तंभ या ठिकाणी आपण कार्यक्रम घेत आहोत तेव्हा येणा-या कालावधीत ओबीसीची महायात्रा या ठिकाणी भरली पाहीजे याचा सर्व ओबीसी कार्यकर्त्यांनी विचार करावा असे मत मांडले.

या कार्यक्रमाच्या समारोप प्रंसगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.आ.डॉ.नारायणराव मुंढे (देशातील प्रथम मंडल स्तंभ निर्माते) यांनी आपल्या विचारात सांगितले की, आम्ही भारताचे नागरीक आहोत आम्हाला न्याय मिळाला पाहीजे. याच बरोबर या देशात ओबीसीच्या ताटातील अन्न व आत्मसन्मान काढून घेतला जात आहे. तेव्हा गावागावातील सर्व ओबीसींनी लढा व संघर्ष केला पाहीजे.तसेच हे शासन आपल्या विरोधात आहे. आपण जबाबदारीने काम केले पाहीजे. विशेषत: मी शेवटच्या श्वासांपर्यंत ओबीसींचे काम करणार आहे असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.सत्संग मुंढे (अध्यक्ष, मंडल स्तंभ स्मारक समिती.) यांनी केले तर ॲड विजय खटके यांनी मानले. या कार्यक्रमास दोदडगांव येथील ग्रामस्थ मंडळी, ओबीसी कार्यकर्ते व मंडल स्तंभ स्मारक समिती व समितीतील सदस्य इत्यादींची बहुसंख्य प्रमाणात उपस्थिती होती. **(स्वाक्षरीत)**

**आपला**

दिनांक :- 26/07/2021

प्रति,
मा.संपादक साहेब,
दैनिक ____________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

# पवन मुंढे यांचे ICSE 10 वी बोर्ड परीक्षेत सुयश

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय जालना येथे दिनांक 26.07.2021 रोजी भगवान शिक्षण प्रसारक मंडळ, गेवराई चे कोषाध्यक्ष, मा.प्रा.सत्संगजी मुंढे यांचे चिरंजिव पवन मुंढे यास ICSE 10 बोर्ड परीक्षेमध्ये द बिशप्स स्कूल पुणे येथे शैक्षणिक वर्षे 2020-21 मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षे मध्ये 92.02% गुण प्राप्त केले आहेत. याबददल राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी पुष्पहार अर्पण करुन स्वागत केले व पुढील शिक्षणासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

यាप्रसंगी महाविदयालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची बहुसंख्य प्रमाणात उपस्थिती होती.

प्राचार्या
PRINCIPAL 26-07-2021
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयामध्ये सुजोग थेरपी विषयी व्याख्यान संपन्न

दि. २८/०८/२०२१

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय येथे दि. २८/०८/२०२१ रोजी सुजोग थेरपी संदर्भात व्याख्यान आयोजित करण्यात आले. विषय:- सुजोग थेरपी संदर्भात व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रमुख व्याख्याते प्रा. डॉ. गंगाधर नारकर या कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ. सुनंदा गिडके, डॉ. सोमिनाथ खाडे, नारकर यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रम प्रसंगी प्रा. डॉ. गंगाधर नारकर (मुंबई) म्हणाले की. चांगल्या मानवी जीवन जगत असतांना पूर्वीच्या काही गोष्टी आणल्या पाहिजे तसेच योगा त्या आपण दैनंदिन जीवनात उपयोगी आणल्या पाहिजे स्त्री पुरुषांनी लहान हात पाय यांचे व्यायाम करणे गरजेचे आहे. त्याकडे दुर्लक्ष करु नये याचबरोबर शरीर रचना व्यवस्थित ठेवण्यासाठी नियमित व्यायामाची गरज आहे. भारत देशात कमी वयात मरण पावणाऱ्यांची लोकसंख्या जास्त आहे याचा विचार करुन आहार विहार याकडे लक्ष देणे महत्वाचे आहे. याचबरोबर उठणे सर्वांनी सकाळी ३ ते ४ मिनिट उठल्याबरोबर लगेच उभा राहण्याऐवजी कमीत कमी ३ ते ४ मिनिट बसून राहणे व काही कालावधी नंतर उभा राहणे महत्वाचे आहे. तसेच विविध शरीर अवयवासाठी विविध पॉईंट आहेत त्यांचा योग्य वापर करण्यात यावा असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षा प्राचार्य डॉ. सुनंदा गिडके यांनी म्हटले की. आपण सर्वांनी व कुंटुबातील व्यक्तींनी आहार चांगला होणे हे महत्वाचे आहे. तसेच सर्वांनी सकारात्मक विचार अंगी बाळगला पाहिजे. स्त्री पुरुष या सर्वांना जीवनात ताण तणाव असतो तरी सुद्धा तो ताणतणाव कमी होण्यासाठी आपण जवळच्या व्यक्तीजवळ पूर्णपणे व्यक्त होणे गरजेचे आहे. विशेषत: डॉ. नारकर साहेबांनी सांगितलेल्या विविध पॉईंटचा योग्य वापर करुन आरोग्याची चांगली काळजी घ्यावी असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. सोमिनाथ खाडे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. गाडेकर यांनी मानले. या कार्यक्रमास प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Art
Science & Commerce College, Jal

दिनांक :- 13/08/2021

प्रति,
मा.संपादक साहेब,
दैनिक ____________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात
## पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर पुण्यतिथी साजरी

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय जालना येथे दि.13.08.2021 रोजी पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके, प्रमूख पाहुणे मा.प्रा.सत्संग मुंढे (उपाध्यक्ष, भगवान शिक्षण प्रसारक मंडळ,गेवराई.) प्रा.डॉ.शोभा यशवंते, प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे यांनी प्रारंभी पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

याप्रसंगी मा.प्रा.सत्संग मुंढे यांनी आपले विचार व्यक्त करतांना म्हटले की, राजमाता पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यांनी केलेल्या कार्याची सर्वांनी प्रेरणा घेतली पाहिजे. तसेच राजमाता आहिल्याबाई होळकर यांच्या इतिहासाची कामगीरी समजून घेवून प्रत्येकानी आदर्श निर्माण केला पाहीजे असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी म्हटले की, राजमाता आहिल्याबाई होळकर यांनी केलेले कार्य समाजउपयोगी होते. तसेच आहिल्याबाई होळकर यांनी पूर्वीच्या काळात अतिशय शूर पध्दतीने कामकाज केले. त्याचा आजही राज्यामध्ये फायदा होत असतांना दिसत आहे असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रम प्रसंगी प्रा.डॉ.शोभा यशवंते, डॉ.सामीनाथ खाडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.सोपान चव्हाण यांनी केले तर आभार प्रा.लहुराव दरगुडे यांनी मानले. या कार्यक्रमास प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

प्राचार्या
डॉ.सुनंदा तिडके

PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna.

दिनांक :- 15/08/2021

प्रति,
मा.संपादक साहेब,
दैनिक ____________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय येथे दिनांक 15/08/2021 रोजी भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त् सकाळी ठिक 7.30 वाजता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन मा.प्रा.सत्संग नारायणराव मुंढे (उपाध्यक्ष,भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके, श्री.भास्कर शिंदे,कु.समृध्दी सत्संग मुंढे, चि.पवन सत्संग मुंढे यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे ध्वजसंचलन प्रा.डॉ.रामपुरे पी.जी. यांनी केले. यावेळी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

प्राचार्या
PRINCIPAL
डॉ. सुनंदा तिडके
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

# डॉ. खाडे यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्कार



मराठवाडा साथी न्यूज

जालना। येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात आ
प्रा डॉ. सोमीनाथ खाडे यांना महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय राष्ट्री
सेवा योजना कार्यक्रमाअधिकारी उत्कृष्ट पुरस्कार प्राप्त झाला. याबद्द
सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके व प्रा.सत्सं
नारायणराव मुंढे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी भास्कर शि
व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी सर्वांच्या वतीने प्रा.डॉ.सोमीना
खाडे यांचा शाल, श्रीफळ देवून सन्मानपुर्वक सत्कार करण्यात आला. य
कार्यक्रमा प्रसंगी मा.प्रा.सत्संग मुंढे यांनी म्हटले की, महाविद्यालय हे समा
परिवर्तनाचे केंद्र आहे.त्यामुळे प्रत्येकांनी नाविन्यपुर्ण कार्ये केले पाहीजे
एखादी संधी मिळाली तर उत्तम कार्यामधून सोने केले पाहीजे हा हे
मनात ठेवून डॉ.सोमीनाथ खाडे यांनी प्रमाणिकपणे कार्य केले. त्याबदद
त्यांचा सत्कार करतांना संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ.नारायणराव मुंढे
मला मनापासून आनंद झाला आहे. तर प्राध्यापक सोमीनाथ खाडे यां
मिळालेला पुरस्कार हा त्यांच्या परिश्रमाची फलश्रुती असल्याचे प्राचार
डॉ. सुनंदा तिडके यावेळी बोलताना म्हणाल्या. यावेळी महाविद्यालयाती
प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

दिनांक :- 23/08/2021

प्रति,
मा.संपादक साहेब,
दैनिक ____________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता **इंदिरा गांधी** महाविदयालयात
## **डॉ.बाबासाहेब आंबेडकर** मराठवाडा विदयापीठ **दिन साजरा**

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय येथे दिनांक 23/08/2021 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ वर्धापन दिनानिमित्त सकाळी ठिक 7.30 वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी श्री.अर्जुन भाबड यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे ध्वजसंचलन प्रा.डॉ.प्रताप रामपूरे यांनी केले. या कार्यक्रमास प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होती.

प्राचार्या
डॉ. सुनंदा तिडके


PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

दै. दिव्य मराठी

दि. २४/०८/२०२१

## राष्ट्रमाता इंदीरा गांधी महाविद्यालयात ध्वजारोहण

**जालना** | शहरातील राष्ट्रमाता इंदीरा गांधी महाविद्यालयात प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांच्या हस्ते विद्यापीठ वर्धापण दिनी ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी अर्जुन भाबड यांची उपस्थिती होती. यावेळी ध्वजसंचलन प्रा.डॉ. प्रताप रामपुरे यांनी केले. प्राध्यापक वृंदाची उपस्थिती होती.



राष्ट्रमाता इंदीरा गांधी महाविद्यालयात ध्वजारोहण करण्यात आले.

भ

दि

दिनांक :- 27/08/2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ____________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयाचा 30 वा वर्धापन दिन साजरा

जालना दि.27 ऑगस्ट 2021 रोजी भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई संचलित, राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात भगवान शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष, प्रा.सत्संग मुंढे सर यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके, माजी का.अधिक्षक श्री.भास्कर शिंदे यांची प्रमूख उपस्थिती होती.

या कार्यक्रमास महाविदयालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्त्र कर्मचारी, विदयार्थी उपस्थित होते. वर्धापन दिनाचा कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, इंदिरा गांधी, राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करुन व दिप प्रज्वलन करुन मान्यवरांच्या हस्ते सुरुवात झाली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य सुनंदा तिडके, प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य डॉ.जवाहर काबरा, महाविदयालयाचे माजी विदयार्थी प्रा.डॉ.महेंद्र साळवे (वनस्पतीशास्त्र विभाग,व्यंकटेश महा.दे.राजा), मा.सुनिता कांबळे (कदिम जालना पोलीस स्टेशन), श्री.रमेश राठोड (कदिम जालना पोलीस स्टेशन), प्रा.भिमराव वाघ, प्रा.लहु दरगुडे, श्री.भाबड ऐ.पी. हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करत असतांना प्रा.डॉ.महेंद्र साळवे यांनी आपल्या विदयार्थी जिवनातील आठवंणींना उजाळा देत आपले अनुभव कथन केले. याप्रसंगी श्री.रमेश राठोड यांनी आपल्या आठवणी सांगत असतांना महाविदयालयाचा स्वतःच्या प्रगतीमध्ये फार मोठा वाटा आहे असे अनुभव सांगितले.

सुनिता कांबळे यांनी महाविदयालयातून 12 वी ते एम.ए. पर्यंत शिक्षण पुर्ण केले, महाविदयालयाच्या आपल्या जडणघडणीमध्ये असलेले योगदान कथन केले.

प्रमुख उपस्थितीत असलेले प्राचार्य डॉ.जवाहर काबरा यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हटले की, महाविदयालयाची तुलना ही पायाभूत सुविधांवर नाही तर शिक्षणाचा दर्जा कसा आहे हा तुलनेचा विषय आसावा, आपले ज्ञान हे वैश्चीक असायला हवे. परीक्षेत मार्क मिळविण्या बरोबरच जिवणाच्या विविध क्षेत्रामध्ये प्राविण्य मिळविणे आणि विजय मिळविणे हे ध्येय ठेवले पाहीजे. शिक्षकांनी विदयार्थ्याचा अवगत गुण ओळखून विदयार्थ्यांना संधी देणे म्हणजे जिवनाचे युध्द जिंकण्यास सक्षम बनविले पाहीजे. महाविदयालयाच्या भावी वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या.

अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके यांनी केला समारोप प्रसंगी प्राचार्य मॅडम यांनी बोलतांना महाविदयालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला व संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ.नारायणराव मुंढे साहेब यांची प्रेरणा आम्हाला काम करण्यात नेहमी प्रेरणा देत असतात, त्या बळावर आम्ही विदयार्थी घडविण्याचे, देश आणि समाज घडविण्याचे काम करत असतो. आणि शिक्षक म्हणून आमचे काम करतो त्याचे उदाहरण आज आमचे विविध पदावर विराजमान विदयार्थी साद देत आहेत. असे मत व्यक्त केले.

आपल्या खुमासदार शैलीत कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.शोभा यशवंते यांनी केले. महाविदयालयाच्या वर्धापन दिनानिमित्त् ऑनलाईन पध्दतीने घेतलेल्या विविध स्पर्धेमध्ये गुणवंत विदयार्थ्यांना प्रमुख पाहुणे आणि प्राचार्य यांच्या हस्ते विजयी विदयार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.डॉ.सोपान चव्हाण यांनी केले. यावेळी महाविदयालयातील विदयार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

प्राचार्या
PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

# राष्ट्रमाता महाविद्यालय परिसर स्वच्छता मोहीम

जालना [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] उपस्थित [illegible] स्वच्छतेचे महत्त्व [illegible] परिसर स्वच्छतेत [illegible] सहभाग नोंदविला. कार्यक्रमास रासेयोचे जिल्हा समन्वयक डॉ. प्रा. सोमीनाथ खाडे, प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, प्रा. भीमराव वाघ, प्रा. [illegible] दरगडे, डॉ. [illegible], डॉ. प्रा. विजय केंद्रे, [illegible] राठोड व [illegible] उपस्थित होते.

दिनांक :- 02/09/2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ____________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## सामाजिक न्यायासाठी काम हेच ध्येय

## प्रा.सत्संग मुंढे

जालना दि.2.9.2021 राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयामध्ये राष्ट्रमाता परिवाराच्या वतीने मा.प्रा.सत्संग नारायणराव मुंढे उपाध्यक्ष, भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गवराई यांचा महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस कमिटीच्या सचिव पदी निवड झाल्याबददल दि.2.9.2021 रोजी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके, प्रमुख पाहुणे श्री.अर्जुन भाबड हे होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.सोमीनाथ खाडे यांनी केले. सत्कारमूर्ती मा.प्रा.सत्संग मुढे यांनी आपल्या सत्कार प्रसंगी उत्तर देत असतांना आपल्या भावना व्यक्त केल्या. सामाजिक न्यायासाठी काम करणे आपले ध्येय असणार आहे असा मानस त्यांनी व्यक्त केला. मी सामान्य मानसांवर आणि आपणा सर्वावर प्रेम करतो.तसेच प्रेम आणि सहकार्य आपल्या कडुन असावे असे अवाहन केले.

महाविदयालयाने आपणास खूप काही दिले आहे. यापुढे मा.आ.डॉ.नारायणराव मुंढे साहेब, अध्यक्ष भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई यांचे विचार पुढे नेण्याचे काम करणार आहे असे मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. लोकशाही प्रणाली मध्ये स्वातंत्रय लढयाचा उज्वल इतिहास हा कॉंग्रेसला आहे. माणासाने माणुस म्हणुन काम करणे हे महत्वाचे आहे. प्रा.मुंढे सरांनी विविध पदावर काम केले आहे त्या सर्व कामाचा गौरव,आणि श्रेय हे निश्चीतच आपणास मिळाले आहे. आपल्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा राष्ट्रमाता परिवारातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विदयार्थी यांच्या वतीने शुभेच्छा व्यक्त केल्या.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.लहु दरगुडे यांनी केले तर आभार श्री.संतोष् साबळे यांनी मानले. यावेळी राष्ट्रमाता परिवारातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी सत्कारमूर्ती मा.प्रा.सत्संग मुंढे सर यांचा सत्कार केला. यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

प्राचार्या

PRINCIPAL

Rashtramata Indira Gandhi Arts

Science & Commerce College, Jalna

दिनांक :- 22/09/2021

प्रति,
मा.संपादक साहेब,
दैनिक ______________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकांमध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## स्व.राजीवभाऊ जयंती युवक प्रेरणा दिनानिमित्त

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

जालना दिनांक 22/09/2021 रोजी जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात संसदरत्न स्व.राजीवजी सातव यांच्या जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे मुख्य संयोजक मा.प्रा.सत्संगजी मुंढे, सचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी तथा उपाध्यक्ष,भ.शि.प्र.मंडळ गेवराई आणि राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय यांच्या वतीने करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.आ.डॉ.नारायणराव मुंढे, जेष्ठ काँग्रेस नेते तथा,अध्यक्ष भ.शि.प्र.मंडळ गेवराई हे होते. या कार्यक्रमाचे उदघाटन मा.आ.राजेशभैया राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा.मनोज बागडी,राष्ट्रीय समन्वयक अखिल भारतीय काँग्रेस कमिटी अनुसुचित जाती विभाग, मा.जितेंद्रजी देहाडे, सचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, मा.विजयजी कामड, काँग्रेस नेते, श्री.पवन डोंगरे, श्री.नारायण वाढेकर आणि प्राचार्य डॉ.सुंनदा तिडके हे उपस्थित होते.

संसदरत्न राजीवजी सातव यांच्या जयंती दिन हा युवक प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.प्रा.सत्संगजी मुंढे, सचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी तथा उपाध्यक्ष,भ.शि.प्र.मंडळ गेवराई यांनी केले. कार्यक्रमाची प्रेरणा ही स्व.राजीव सातव यांचे विचार आणि काम करण्याची हातोटी ही सर्वांना प्रेरणा देणारी आहे. यांचा विचार चिरंतर ठेवण्यासाठी आम्ही काम करत राहू असे अभिवचन त्यांनी आपल्या प्रास्ताविकपर संदेशात दिले.

मा. जितेंद्रजी देहाडे यांनी स्व.विलासराव देशमुख यांच्या नंतर मराठवाडा विभागाचा समर्थ नेता आपण गमवला आहे, त्यांचे सामान्य कार्यकर्त्याला दिशा आणि शक्ती देण्याची गुण विलक्षण होते असे सांगितले. कार्यक्रमाचे उदघाटक मा.आ.राजेशभैया राठोड यांनी असे सांगितले की, मा.खा.राहूल गांधी यांच्या आदेशानुसार स्व.राजीव सातव हे रांगेतील शेवटच्या सामान्य कार्यकर्त्याला बळ देण्याचे काम करत असत. स्वतःच्या वाढदिवसाच्या दिवशी दिल्ली येथे शेतक-यांसाठी आंदोलन करणारे नेते हे राजीव सातवच असू शकतात अशा आठवणी त्यांनी सांगितल्या. प्रमुख पाहुणे मा.मनोज बागडी राष्ट्रीय समन्वयक अखिल भारतीय काँग्रेस कमिटी अनुसुचित जाती विभाग, यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपण सर्व स्व.राजीव सातव यांचे वैचारीक वारसदार आहोत. सामान्य कार्यकर्त्यांसाठी काम करणे हे आपले कर्तव्य आहे. जे वंचित आहेत त्यांना संधी देणे ही काँग्रेस पक्षाची भूमिका आहे.आजच्या परिस्थतीत संविधान संवर्धनाची जबाबदारी ही आपल्यावर आहे.काँग्रेस पक्षाने भारतीय राज्यघटना लिहण्याची संधी ही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उपलब्ध करून दिलेली आहे. आणि त्या संविधाने रक्षन करण्यासाठी काँग्रेस कटिबध्द आहे असे सांगितले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप मा.आ.डॉ.नारायणराव मुंढे, जेष्ठ काँग्रेस नेते तथा,अध्यक्ष भ.शि.प्र.मंडळ गेवराई यांनी केला. यावेळी बोलत असतांना स्व.राजीव सातव यांच्या वडीलांसोबत कार्यकर्ते म्हणून कार्य केले त्यांच्या मातोश्री माजी मंत्री रजनिताई सातव यांच्या सोबत काम केले, सातव परिवारा सोबत पारंपारीक कौटुंबिक संबधाच्या कौटुबिक अठवणीचा उजाळा केला.

काँग्रेस पक्ष हा गोरगरिबांना दलित, वंचितांना सोबत घेवून चालणारा पक्ष आहे आणि तोच पक्ष सर्वसामान्यांना न्याय देवू शकतो असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.लहु दरगुडे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री.संतोष साबळे यांनी केले. या कार्यक्रमामध्ये दुपार पर्यंत 53 रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे,प्रा.भिमराव वाघ,प्रा.डॉ.आलिया कौसर, प्रा.विठ्ठल गाडेकर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी महाविदयालयातील बहुसंख्य प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

PRINCIPAL प्राचार्य

दिनांक :- 04/10/2021

प्रति,
मा.संपादक साहेब,
दैनिक ____________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

**राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात**
**महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी**

जालना दि.02/10/2021 राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय जालना येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पुजन पुष्पहार अर्पन करुन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके हया होत्या तर प्रमुख उपस्थिती प्रा.सत्संग मुंढे (उपाध्यक्ष, भ.शि.प्र.मंडळ गेवराई तथा सचिव,महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी) हे बोलत असतांना, महात्मा गांधी यांनी अहिंसेची आणि सत्याग्रहाची संकल्पना, ही भारताला स्वातंत्र्य मिळवुन देण्यासाठी प्रबळ हत्यार म्हणून वापर केला. त्यांचे श्रेष्ठ विचार तळागाळातील माणसांना जगण्याची प्रेरणा देत असत. आणि त्या काळी खेडयापाठयात नारा असायचा **एक रुपया चांदीचा देश आमचा गांधीचा** माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी आदर्श राजकारणाचे धडे घालवून दिले. प्रा.एल.बी.दरगुडे यांनी गाधींचे सत्याचे प्रयोग, रामराज्य संकल्पना, शेतक-यांचा लढा वर्णभेद यावर भर दिला.

अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके यांनी केला, त्यांनी महात्मा गांधी यांचे आदर्श जिवण पध्दती, स्त्री-पुरुष समानता, साधी राहणी उच्च् विचार सरणी, स्वावलंबन, सत्याचे प्रयोग आदी कार्यावर सविस्तर विचार मांडले. गांधीजींनी अहिंसा न्याय आणि बंधूता या तत्वाने जगापुढे आदर्श निर्माण करुन दिला आहे. आपण त्या मार्गाने जिवण व्यथीत करणे हीच महापुरुषांना आदरांजली आहे असे विचार मांडले. सुत्रसंचलान प्रा.विजय तिडके यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.ज्योती धर्माधिकारी यांनी मानले.

यावेळी प्रा.लहु दरगुडे, प्रा.सचिन वाघ आणि महाविदयालयातील बहुसंख्य प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

for
प्राचार्य
PRINCIPAL
डॉ. सुनंदा तिडके
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jaln

दिनांक :- 13/10/2021

प्रति,
मा.संपादक साहेब,
दैनिक ____________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात
## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची पुण्यतिथी साजरी

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय जालना येथे दि.11.10.2021 रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गेवराईचे संस्थापक अध्यक्ष मा.आ.डॉ.नारायणरावजी मुंढे साहेब यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मा.आ.डॉ. नारायणरावजी मुंढे साहेब यांनी राष्ट्रसंत यांच्या जिवनावर मार्गदर्शन केले, साहेब बोलत असतांना 1962 च्या भारत-पाक युध्दाच्या वेळी तुकडोजी महाराजांनी सिमेवर जावून आपल्या सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी उदबोधनपर भजन गाऊन सैनिकांना प्रोत्साहन दिले ते परिवर्तनशिल संत होते असे प्रतिपादन केले.

यावेळी प्रा.सचिन जयस्वाल यांनी सुध्दा तुकडोजी महारांच्या जिवन कार्यावर प्रकाश टाकला 1942 च्या भारत छोडो आंदोलनाचे विदर्भाचे नेतृत्व हे तुकडोजी महाराजांनी केले ते समाजातील अनिष्ठ रुढी आणि परंपरावर तुटुन पडत असत. त्यांचा आदर्श हिच त्यांना आदरांजली ठरेल असे म्हणाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.ज्योती धर्माधिकारी यांनी केले तर आभार प्रा.डॉ.आलिया कौसर यांनी मानले.

यावेळी महाविदयालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कोविड-19 नियमाचे काटेकोर पालन करुन कार्यक्रम संपन्न झाला.

प्राचार्य
डॉ. सुनंदा तिडके
Rashtramata Indira Gandhi Arts
& Science Junior College, Jalna.

**नामविस्तार** • व्याख्याते गडवे यांचे प्रतिपादन, राष्ट्रमाता महाविद्यालयात व्याख्यान

# नामांतराची लढाई ही अस्मितेची होती

प्रतिनिधी । जालना






नामांतराची लढाई ही अस्तित्वाची व अस्मितेची लढाई होती, असे प्रतिपादन व्याख्याते प्रकाश गडवे यांनी केले.

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात नामविस्तार दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके तर प्रमुख पाहुण्या म्हणून प्रा. डॉ. शोभा यशवंते यांची उपस्थिती होती. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. गडवे यांनी महाविद्यालयात परिवर्तनाची चळवळी या होत असतात ही एक चांगली गोष्ट आहे. नामांतराऐवजी नामविस्तार झाला. प्रत्येक विद्यार्थी नीतिवंत, गुणवंत बनावा असा डॉ. बाबासाहेबांचा विचार असल्यामुळे त्यांनी मिलिंद महाविद्यालय, सिद्धार्थ महाविद्यालय व मराठवाडा विद्यापीठाची स्थापना केली. केवळ नावासाठी विरोध करणे हे एक कमकुवत मानसिकतेचे प्रतीक होते. आज आम्ही एका विशिष्ट टप्प्यावर येऊन ठेपलो आहोत परंतु ही परिवर्तनवादी चळवळ पुढे होऊन जाण्यासाठी युवकांनी सज्ज झाले पाहिजे असे ते म्हणाले. प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांनीही हे नामविस्तारासाठीचे योगदान हे महत्त्वपूर्ण होते व त्यासाठी अनेकांनी बलिदान दिले. आम्ही ही परिवर्तनवादी चळवळ पुढे नेऊ, असे सांगितले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. गौतम वाकळे यांनी तर प्रा. सचिन जयस्वाल यांनी आभार मानले. या कार्यक्रमास शासनाचे पूर्ण नियम पाळून प्राध्यापकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

पतवड असा परिवार आहे. वाढवली. त्यानंतर मारवाडी भाषेत उखाणे ...

दै दिव्यमराठी 20-01-2022

अभिवादन • प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांचे प्रतिपादन. संत भगवान बाबा पुण्यतिथी

# वंचित-पीडितांपर्यंत शिक्षण पोहोचवावे

प्रतिनिधी । जालना



संत भगवान बाबा यांचे शैक्षणिक, सामाजिक कार्य अतुलनीय आहे. येणाऱ्या पिढीने ज्ञानाचे पावित्र्य टिकविले पाहिजे. वंचित पिडीतांना जीव लावावा, त्याच्यापर्यंत शिक्षण पोहचवावे हीच खरी भगवान बाबांना श्रध्दाजली होय, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांनी केले.

राष्ट्रमाता महाविद्यालयात संत भगवान बाबा पुण्यतिथी कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी प्रा. रामनाथ पालवे यांची उपस्थिती होती. प्रारंभी संत भगवान बाबा यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. प्रा. पालवे यांनी संत भगवान बाबा यांच्या संतमय जीवनकार्याच्या लहानपणापासूनच्या आठवणी सांगितल्या. मुल्यसंस्काराचे शिक्षण भगवान बाबांनी दिले त्याची रुजवणूक सर्व समाजामध्ये केली. अध्यात्मीक समाजिक संस्काराची शिकवण सर्व समाजाला दिली. समाज परिवर्तन घडविणारे हे थोर संत होते. बाबांनी कृतीतून शिक्षणाचे महत्व पटवून दिले. शिक्षणासाठी त्यांनी शाळा सुरु केल्या व सर्व समावेशक मुलांना शिक्षण दया हे त्यांनी सर्वांना सांगितले आहे. अंधश्रध्दा व अनेक अनिष्ठ रूढी परपराना बंद केल्या, असे सांगितले. सुत्रसंचलन प्रा. डॉ. अभिमन्यु बिक्कड यांनी तर प्रा. विठ्ठल गाडेकर यांनी आभार मानले. याप्रसंगी प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक :- 14/01/2022

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ____________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

**राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात भूगोल दिन साजरा**

14 जानेवारी 2022 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात भूगोल दिन संपन्न झाला. पृथ्वीचा गोल या वेळेस सभागृहात ठेवण्यात आला होता.

याप्रसंगी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके हया अध्यक्ष होत्या तर प्रमूख पाहुणे म्हणून भूगोल विभागाचे प्रा.डॉ.प्रमोद ढोकणे हे उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे, प्रा.भिमराव वाघ यांनी सहकार्य केले.

प्रा.डॉ.प्रमोद ढोकणे यांनी आपले विचार व्यक्त करतांना असे सांगितले की, भूगोल दिन जगामध्ये साजरा केला जातो. प्रा.सी.डी.देशमुख यांच्या नावाने हा साजरा केला जातो. निसर्ग व मानव अशी थिम ठेवली आहे व माणूस पर्यावरणाशी निगडीत असल्यामुळे निसर्गाचे संरक्षण हे झाले पाहीजे असे भूगोलाची भूमिका माणसाने अंगीकारली तर सर्व अंगाने त्याचा मानवाला फायदा होईल असे सांगितले.

अध्यक्षीय भाषणाणात महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी भूगोल दिनाच्या शुभेच्छा दिल्या व मानवाचे सर्व जीवन हे निसर्गाशी जोडलेले असल्यामुळे माणसाने त्याचे भान ठेवले पाहीजे.ऑक्सीजन लेव्हल जी कमी होत आहे ते वाढवण्याचा प्रयत्न मानवाने केला पाहीजे म्हणजे त्याच्यावर संकट येणार नाही असे त्या म्हणाल्या.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.विजय तिडके यांनी केले तर आभार डॉ.सोमीनाथ खाडे यांनी मानले.

याप्रसंगी प्रा.डॉ.नवनाथ शिंदे, श्रीमती शिलाताई खेडकर,प्रा.विजय तिडके,प्रा.सचिन जयस्वाल, प्रा.डॉ.शोभा यशवंते हे उपस्थित होते.

प्राचार्य
PRINCIPAL




वादविवाद स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात आयोजित वक्तृत्व स्पर्धेला प्रतिसाद

प्रतिनिधी । जालना

युवा ललकार कार्यक्रमातंर्गत राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात लायन्स क्लब ऑफ जालना यांच्या संयुक्त विद्यमाने वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके तर प्रमुख पाहुण्या म्हणून लायन्स क्लबच्या अध्यक्षा मीनाक्षी दाड, संजय दाड, प्रकाश कुंडलकर, प्रा. विठ्ठल गाडेकर यांची उपस्थिती होती.

प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात भरपूर वाचन, संवाद करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कोरोना परिस्थीतीत आपले जवळचे नातेवाईक, कौटुंबिक काही व्यक्ती कोरोनामुळे गमावले आहेत. याच काळात आपण सर्वांनी मदतीच्या माध्यमातून जे जे केले तेच जपले पाहिजे. तसेच जगातील माणसे कशी चांगली राहतील याच बरोबर विशेषत: आधुनिक काळात आपण सर्व कौटुंबिक जीवन कसे जगू शकतो व इतरांना मदत करणे हे सुद्धा आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे, असे सांगितले. प्रास्ताविकात प्रकाश कुंडलकर यांनी सांगितले, कोरोनाच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या मनामध्ये जे अनुभव आहेत ते या कार्यक्रमाच्या निमित्ताने व्यक्त व्हावेत यासाठी ही वक्तृत्व स्पर्धा घेतली जात आहे. याचा विद्यार्थ्यांना निश्चित फायदा होईल. या स्पर्धेत १८ स्पर्धकाने सहभाग घेतला. या स्पर्धेत आश्विनी किसन घुगे (प्रथम) शासकीय तंत्र निकेतन नागेवाडी जालना, वर्षा देवसिंग घुसिंगे (द्वितीय) जेईएस महाविद्यालय, जालना, आदिती सुरंगळीकर (तृतीय) बारवाले महाविद्यालय जालना, हर्षल व्यवहारे (उत्तेजनार्थ, डॉ. बा.आं.म.वि. औरंगाबाद) यांनी यश मिळवले. स्पर्धेचे परीक्षक डॉ. शिवानंद हरकळ, बीडकर, डोईफोडे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन प्रा. विठ्ठल गाडेकर यांनी, तर प्रा. भीमराव वाघ यांनी आभार मानले.

# घोषवाक्य, चित्रकला स्पर्धेत संस्कार

# सामाजिक न्यायासाठी काम हेच ध्येय : सत्संग मुंढे


लोकमत न्यूज नेटवर्क

जालना : राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयामधील राष्ट्रमाता परिवारातर्फे [illegible] प्रा. सत्संग मुंढे यांची महाराष्ट्र प्रदेश [illegible] निवड झाल्याबद्दल [illegible] सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, तर प्रमुख पाहुणे [illegible] होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. [illegible] यांनी केले. यावेळी सत्कारमूर्ती प्रा. सत्संग मुंढे म्हणाले, सामाजिक न्यायासाठी काम करणे आपले ध्येय असणार आहे. असा [illegible] त्यांनी व्यक्त केला. [illegible]

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. [illegible] यांनी केले तर आभार [illegible] यांनी मानले. यावेळी राष्ट्रमाता परिवारातील सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी सत्कारमूर्ती प्रा. सत्संग मुंढे यांचा सत्कार केला. यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी [illegible] कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# जालना : सामाजिक न्यायासाठी काम हेच ध्येय-प्रा. सत्संग मुंढे



**जालना/प्रतिनिधी**

जालना-राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयामध्ये राष्ट्रमाता परिवाराच्या वतीने मा.प्रा.सत्संग नारायणराव मुंढे उपाध्यक्ष, भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गवराई यांचा महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या सचिवपदी निवड झाल्याबद्दल दि. 2 सप्टेंबर रोजी सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके तर प्रमुख पाहुणे अर्जुन भावड हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सोमीनाथ खाडे यांनी केले. सत्कारमूर्ती प्रा. सत्संग मुंढे यांनी आपल्या सत्कार प्रसंगी उत्तर देत असतांना आपल्या भावना व्यक्त केल्या. सामाजिक न्यायासाठी काम करणे आपले ध्येय असणार आहे असा मानस त्यांनी व्यक्त केला. मी सामान्य मानसांकर आणि

कडुन असावे, असे अवाहन केले. महाविद्यालयाने आपणास
काही दिले आहे. यापुढे माजी आ. डॉ. नारायणराव मुंढे, अध्
भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई यांचे विचार पुढे नेण्याचे क
करणार आहे असे मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रस
प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांनी आपले मनोगत व्यक्त के
लोकशाही प्रणाली मध्ये स्वातंत्र्य लढ्याचा उज्वल इतिहास
कॉंग्रेसला आहे. माणसाने माणुस म्हणुन काम करणे हे महत्
आहे. प्रा. सत्संग मुंढे सरांनी विविध पतावर काम केले आहे
सर्व कामाचा गौरव आणि श्रेय हे निश्चीतच आपणास मिळाले अ
आपल्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा राष्ट्रमाता परिवारा
प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विदयार्थी यांच्या व
शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा लहु दरगुडे

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा। दि. ०५/०९/२०२२

स्थानिक राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना येथे दि. ०५/०९/२०२२ रोजी सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्त शिक्षक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. रामनाथ पालवे. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. नवनाथ शिंदे डॉ. [illegible] यांनी प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. नवनाथ शिंदे यांनी म्हटले की प्राचीन काळापासून शिक्षण देणे आणि घेणे ही परंपरा आजपर्यंत चालू आहे. ही महत्त्वाची बाब आहे. नवीन गुरु शिष्य हे घडवून घेण्याचे काम महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. रामनाथ पालवे यांनी सांगितले की, आज डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे गुण प्रत्येकांनी आत्मसात करून कार्य करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विठ्ठल गाडेकर यांनी केले तर आभार प्रा. डॉ. विजय कुंडले यांनी मानले. या कार्यक्रमास प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

Rashtramata Indira Gandhi A…

दै. लोकमत दि. २३ सप्टेंबर २०२१




# राजीव सातव यांचे प्रेरणादायी विचार सामान्यांपर्यंत पोहोचविणार : नारायण मुंढे

लोकमत न्यूज नेटवर्क

जालना : येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात संसदरत्न स्व. राजीव सातव यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात ५३ जणांनी रक्तदान केले.

हे रक्तदान शिबिर भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई आणि राष्ट्रमाता इंदिरा गांधी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी आ. डॉ. नारायण मुंढे होते. शिबिराचे उद्घाटन आमदार राजेश राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मनोज बागडी, जितेंद्र देहाडे, विजय कामड, पवन डोंगरे, नारायण वाढेकर आणि प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके उपस्थित होत्या.

संसदरत्न राजीव सातव यांची जयंती युवक प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक प्रा. सत्संग मुंढे यांनी केले. स्व. राजीव सातव यांचे विचार आणि काम करण्याची हातोटी ही सर्वांना प्रेरणा देणारी होती. त्यांचे विचार चिरंतर ठेवण्यासाठी आम्ही काम करत राहू असे मुंढे यांनी सांगितले.



खासदार स्व. राजीव सातव यांच्या जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

जितेंद्र देहाडे यांनी, स्व. विलासराव देशमुख यांच्यानंतर मराठवाडा विभागाचा समर्थ नेता आपण गमवला आहे. त्यांचे सामान्य कार्यकर्त्याला दिशा आणि शक्ती देण्याचे गुण विलक्षण होते, असे सांगितले. कार्यक्रमाचे उद्घाटक राजेश राठोड यांनी, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा खा. राहुल गांधी यांच्या आदेशानुसार स्व. राजीव सातव हे रांगेतील शेवटच्या सामान्य कार्यकर्त्याला बळ देण्याचे काम करत असत. स्वतःच्या वाढदिवसाच्या दिवशी दिल्ली येथे शेतकऱ्यांसाठी आंदोलन करणारे नेते हे राजीव सातवच असू शकतात, अशा अनेक आठवणी त्यांनी सांगितल्या.

मनोज बागडी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. काँग्रेस पक्ष हा गोरगरिबांना दलित, वंचितांना सोबत घेऊन चालणारा पक्ष आहे आणि तोच पक्ष सर्वसामान्यांना न्याय देऊ शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सूत्रसंचालन प्रा. लहू दरगुडे यांनी केले. आभार संतोष साबळे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच कर्मचाऱ्यांनी मदत केली. भविष्यातही अशाच प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतील, असे मुंढे म्हणाले.

## आठवणींना उजाळा

अध्यक्षीय समारोप डॉ. नारायण मुंढे यांनी केला. स्व. राजीव सातव यांच्या वडिलासोबत कार्यकर्ते म्हणून कार्य केले. त्यांच्या आई माजी मंत्री रजनीताई सातव यांच्या सोबतही काम केले. सातव परिवारासोबत पारंपरिक संबंधाच्या कौटुंबिक आठवणींना त्यांनी उजाळा दिला.

दै. लोकमत दि. २३ सप्टेंबर २०२१



# राजीव सातव यांचे प्रेरणादायी विचार सामान्यांपर्यंत पोहोचविणार : नारायण मुंढे

लोकमत न्यूज नेटवर्क

जालना : येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात संसदरत्न स्व. राजीव सातव यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात ५३ जणांनी रक्तदान केले.

हे रक्तदान शिबिर भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई आणि राष्ट्रमाता इंदिरा गांधी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी आ. डॉ. नारायण मुंढे होते. शिबिराचे उद्घाटन आमदार राजेश राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मनोज बागडी, जितेंद्र देहाडे, विजय कामड, पवन डोंगरे, नारायण वाढेकर आणि प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके उपस्थित होत्या.

संसदरत्न राजीव सातव यांची जयंती युवक प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक प्रा. सत्संग मुंढे यांनी केले. स्व. राजीव सातव यांचे विचार आणि काम करण्याची हातोटी ही सर्वांना प्रेरणा देणारी होती. त्यांचे विचार चिरंतर ठेवण्यासाठी आम्ही काम करत राहू असे मुंढे यांनी सांगितले.

जितेंद्र देहाडे यांनी, स्व. विलासराव देशमुख यांच्यानंतर मराठवाडा विभागाचा समर्थ नेता आपण गमवला आहे. त्यांचे सामान्य कार्यकर्त्याला दिशा आणि शक्ती देण्याचे गुण विलक्षण होते, असे सांगितले. कार्यक्रमाचे उद्घाटक राजेश राठोड यांनी, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा खा. राहुल गांधी यांच्या आदेशानुसार स्व. राजीव सातव हे रांगेतील शेवटच्या सामान्य कार्यकर्त्याला बळ देण्याचे काम करत असत. स्वतःच्या वाढदिवसाच्या दिवशी दिल्ली येथे शेतकऱ्यांसाठी आंदोलन करणारे नेते हे राजीव सातवच असू शकतात, अशा अनेक आठवणी त्यांनी सांगितल्या.

मनोज बागडी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. काँग्रेस पक्ष हा गोरगरिबांना दलित, वंचितांना सोबत घेऊन चालणारा पक्ष आहे आणि तोच पक्ष सर्वसामान्यांना न्याय देऊ शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सूत्रसंचालन प्रा. लहू दरगुडे यांनी केले. आभार संतोष साबळे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच कर्मचाऱ्यांनी मदत केली. भविष्यातही अशाच प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतील, असे मुंढे म्हणाले.



खासदार स्व. राजीव सातव यांच्या जयंती निमित्त रकदान शिबिराचे आयोजन केले होते.

## आठवणींना उजाळा

अध्यक्षीय समारोप डॉ. नारायण मुंढे यांनी केला. स्व. राजीव सातव यांच्या वडिलांसोबत कार्यकर्ते म्हणून कार्य केले. त्यांच्या आई माजी मंत्री रजनीताई सातव यांच्या सोबतही काम केले. सातव परिवारासोबत पारंपरिक संबंधाच्या कौटुंबिक आठवणींना त्यांनी उजाळा दिला.

दै. लोकमत दि. १५/१०/२०२१

# गुणवंतांचा सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

जालना : आयआयटी पात्रता परीक्षेत रोहन पडुळकर आणि हृषीकेश लईखेडकर यांनी उत्कृष्ट मार्क मिळविले. त्याबद्दल त्यांचा पालकांसह भाग्यनगरमध्ये सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. सत्संग मुंडे, शुभदा मुंडे, डॉ. संजय लईखेडकर, रविकुमार



भाग्यनगरमध्ये आयआयटी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्यांचा सत्कार करण्यात आला.


## जालना शहरातील **श्री रोहन** पडूळकर **व श्री हर्षवर्धन** रुईखेडकर **हे**
## **आय.आय.टी.** जागतिक नामांकित **संस्था प्रवेशासाठी पात्र**

जालना येथील भाग्यनगर, कॉलनीच्या वतीने दि. १६/१०/२०२१ रोजी आय.आय.टी. या जागतिक नामांकित संस्थामध्ये प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या गुणानुक्रमे श्री रोहन रविकुमार पडूळकर (११२२), श्री हर्षवर्धन संजय रुईखेडकर (३८१६) हे दोन्ही विद्यार्थी जेईई ॲडव्हांस परिक्षा उत्तीर्ण होऊन त्यांनी यश संपादन केले आहे. विशेषतः देशातील एकमेव उदाहरण असेल जे की, एकाच वर्गातील ते म्हणजे नर्सरी ते १२ वी वर्गात एकत्र राहून हे यश त्यांनी मिळविले आहे. या कौतुकास्पद कामगिरी बजावली या करीता या दोन्ही विद्यार्थी व त्यांच्या पालकाच्या सत्काराचे आयोजन अश्लेषा इंग्लिश स्कुल, भाग्यनगर जालना येथे केले. यावेळी कार्यक्रमाचे मुख्य संयोजक प्रा.सत्संग मुंढे (अध्यक्ष - अश्लेषा इंग्लिश स्कुल जालना) सौ, शुभदा मुंढे (संचालिका - अश्लेषा इंग्लिश स्कुल जालना) तसेच कॉलनीतील नागरीकांनी एकत्र येवून श्री रोहन पडूळकर व हर्षवर्धन रुईखेडकर यांचा तसेच श्री रविकुमार पडूळकर, सौ. शिल्पा पडूळकर, श्री देशपांडे साहेब, (माजी तहसिलदार) सौ. डॉ.पौर्णिमा देशपांडे, श्री मेहेत्रे साहेब (माझी आगार प्रमुख) इत्यादींचा सत्कार व कौतुक करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या यावेळी प्रा.लहूराव दरगुडे, श्री पवन मुंढे, कु. समृध्दी मुंढे इत्यादी मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

स्वाक्षरीत

श्री संतोष साबळे

# इंदिरा गांधी, वल्लभभाई पटेल यांना अभिवादन



जालना शहरातील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात लोह पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रथम मंडळ स्तंभ निर्माते डॉ. नारायणराव मुंढे, प्रा. सत्संग मुंढे, सुबोध मुंढे, प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, डॉ. ज्योती धर्माधिकारी, प्रा. सचिन जयस्वाल आदी उपस्थित होते.

## वाल्याचा वाल्मीकी होणे हे मानवी परीवर्तनाचे मापदंड आहे

**- मा.आ.डॉ.नारायणरावजी मुंढे**

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात महर्षी वाल्मीकी जयंती साजरी

जालना दि.20.10.2021 भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई संचलित राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय जालना येथे दि.20.10.2021 रोजी महर्षी वाल्मीकी यांची जयंती साजरी करण्यात आली.

महर्षी वाल्मीकी यांच्या प्रतिमेचे पुजन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.आ.डॉ.नारायणरावजी मुंढे यांच्या हस्ते हार अर्पन करुन करण्यात आले यावेळी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांची प्रमुख उपस्थितीती होती. यावेळी प्रा.डॉ.ज्योती धर्माधिकारी यांनी मनोगत व्यक्त करत असतांना महर्षी वाल्मीकी यांनी रामायण या ग्रंथाचे निर्माण केले असे सांगितले. श्री.संतोष साबळे यांनी वाल्मीकी यांच्या जिवनामध्ये झालेला अमुलाग्र बदल आणि त्यांना रामायण निर्मीती यावर प्रकाश टाकला.

प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी धर्मग्रंथाचे मौलीक योगदान हे आजचा आदर्श समाज निर्मितीमध्ये अन्यन्य साधारण महत्व असते. रामायणामध्ये आदर्श पिता, आदर्श माता,भगिनी,बंधू, प्रजा राज्य करण्याची पध्दत, याचे आदर्श प्रतिबिंब समावलेले आहे. स्त्री पुरुष समानता, नाते संबध यावर सुध्दा प्राचार्य तिडके मॅडम यांनी प्रकाश टाकला.

अध्यक्षीय समारोप संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.आ.डॉ.नारायणरावजी मुंढे साहेब यांनी केला. त्यांनी वाल्मीकी रुषी हे दरोडेखोराचे काम करत असत, त्यांना नंतर आपल्या हया वाईट कामात म्हणजे पापात कुणीही भागिदार होणार नाही.याचा पश्चाताप झाला आणि त्यांनी नंतर घोर तपश्चर्या करुन रामायण या ग्रंथाची निर्मिती केली. वाल्याचा वाल्मीकी होणे हे मानवी परिवर्तनाचे फार मोठे उदाहरण आहे. आपण सर्वांनी आपल्या जिवणामध्ये स्विकारले पाहीजे असे सांगितले. प्रा.डॉ.आलिया कौसर यांनी आपले थोडक्यात मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आणि आभार प्रा.लहुराव दरगुडे यांनी केले. यावेळी महाविदयालयातील बहुसंख्य प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विदयार्थी उपस्थित होते.

प्राचार्य

डॉ. सुनंदा तिडके

**राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात**

**मिशन युवा स्वास्थ माहिमे अंतर्गत दि.29 ऑक्टोंबर 2021**

# कोविड लसिकरण कॅम्प चे आयोजन

जालना दि.26.10.2021

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय जालना येथे महाराष्ट्र शासन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ औरंगाबाद व मा.जिल्हाधिकारी साहेब जालना यांच्या आदेशानुसार दि.25 ऑक्टोंबर ते 2 नोव्हेंबर 2021 या कालावधीमध्ये मिशन युवा स्वास्थ मोहिम अंतर्गत **कोविड लसिकरण कॅम्प चे आयोजन दि.29.10.2021 रोजी करण्यात आले आहे.** या लसिकरण कॅम्पचे उदघाटन मा.आ.डॉ.नारायणरावजी मुंढे साहेब, संस्थापक अध्यक्ष भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई यांच्या हस्ते वेळ स.10.00 वाजता करण्यात येणार आहे. प्रमुख उपस्थिती प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके यांची राहणार आहे.

यावेळी महाविदयालयातील 18 वर्षावरील, ज्यांचे लसीकरण झाले नाही असे सर्व विदयार्थी आणि लसीकरण न झालेले त्यांचे नातेवाईक यांच्यासाठी लसीकरण कॅम्प मध्ये होणार आहे. ज्यांना लस घ्यायची आहे त्यांना सोबत आधार कार्ड असणे अनिवार्य आहे.

तरी या लसीकरणाचा महाविदयालयातील 18 वर्षावरील विदयार्थी आणि त्यांचे नातेवाईक यांनी लस घ्यावी 'असे अवाहन राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके, रा.से.यो. चे कार्यक्रमाधिकारी आणि नोडल अधिकारी प्रा.विठठल गाडेकर,रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ.सोमीनाथ खाडे, प्रा.भिमराव वाघ, प्रा.डॉ.आलिया कौसर यांनी केले आहे.

प्राचार्य

**डॉ. सुनंदा तिडके**

**PRINCIPAL**

Rashtramata Indira Gandhi Arts

Science & Commerce College, Jalna

दिनांक :- 29/10/2021

प्रति,
मा.संपादक साहेब,
दैनिक ____________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

**राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात युवा स्वास्थ मिशन अंतर्गत कोविड-19 लसिकरणाचे उदघाटन संपन्न**

जालना दि.29.10.2021 भ.शि.प्र.मंडळ गेवराई संचलित राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय जालना येथे दि.29.10.2021 रोजी सकाळी 10.00 वाजता मिशन युवा स्वास्थ अंतर्गत कोविड-19 लसिकरणाचे उदघाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.आ.डॉ.नारायणरावजी मुंढे साहेब यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख उपस्थितीत महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या उपस्थित होत्या. लसिकरण शिबिराला जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने पुजा गेडाम मॅडम, सुनिल घनसावंत साहेब, डॉ.शिवाजी आसाबे, अर्चना घोटकर, ज्योती कुलकर्णी, भाले सिस्टर हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय यांच्या संयुक्त विदयमाने करण्यात आले. शिबिर उदघाटन प्रास्ताविक प्रसंगी प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी कोविड-19 चे भिषण वास्तव कथन केले. हे सर्व आपण अनुभवलेच आहे. यावेळी आपले आत्पजन सहकारी आणि कोरोना युध्दे आपण गमावले आहेत. अशा बिकट प्रसंगी सर्व जग थांबले होते शिक्षण क्षेत्र सुध्दा त्याला अपवाद नाही. कोरोना महामारीच्या काळात मदत करायला फक्त डॉक्टर, अरोग्य कर्मचारी, पोलीस कर्मचारी, आशा वर्कर्स हे देतदूता प्रमाणे समाजाच्या कामी आले त्याबददल समाजाच्या वतीने त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोप संस्थेचे अध्यक्ष आणि कार्यक्रमाचे उदघाटक मा.आ.डॉ.नारायणरावजी मुंढे साहेब यांनी केला ते असे म्हणाले की, व्यक्तींच्या जन्मापासून ते मरणापर्यंत डॉक्टर हे देवदूताप्रमाणे आपल्या सोबत असतात त्यांची प्रतिमा फार मोठी आहे. डॉक्टरच्या पवित्र कार्याबददल सर्वांनी कृतज्ञ राहिले पाहिजे असे त्यांनी अवाहन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचल रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा.भिमराव वाघ तर आभार प्रदर्शन रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.आलिया कौसर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रा.से.यो जिल्हा समन्वयक प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे आणि रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी प्रा.विठ्ठल गाडेकर यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमास महाविदयालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी आणि विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत महाविदयालयातील विदयार्थ्यांना कोविड चे लसिकरण करण्यात आले. दिवसभर लसिकरण करण्यात आले.

# राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरा

दि.11.11.2021

भ.शि.प्र.मं. गेवराई संचलित राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय जालना येथे दि.11.11.2021 रोजी स्वातंत्र्य भारताचे पहिले शिक्षण मंत्री मौलाना अब्दुल कलाम आझाद यांची जयंती, राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके हया होत्या तर प्रमुख उपस्थिती प्रा.शेख वाहब हे होते. याप्रसंगी प्रा.शेख वाहब यांनी भारतरत्न मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या संपुर्ण जिवनावर प्रकाश टाकला. आझाद यांचे स्वातंत्र्य लढयातील योगदान आणि त्यांचे कार्य यावर प्रा.वहाब यांनी विस्तृत विवेचन केले.

अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके यांनी केला. याप्रसंगी त्यांनी मौलाना आझाद हे प्रखर देशभक्त होते. शिक्षणाप्रती आस्था आणि शिक्षण क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल हे मौ.आझाद यांनी आपल्या शिक्षण मंत्री पदाच्या कार्यकाळात घडवुन आणले. शिक्षण क्षेत्र हे पक्षातीत आणि धर्म निरपेक्ष राखण्याचे महान कार्य त्यांनी केले. आपण आपले शैक्षणिक कार्य तळमळीने आणि प्रामाणिक पणे करणे हीच मौ.आझाद यांना आदरांजली ठरेल असे मत व्यक्त केले.

या राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.सचिन जयस्वाल यांनी केले व

दिनांक :- 15/11/2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ________________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

**बिरसा मुंडा यांची जयंती राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात साजरी**

जालना दि.15.11.2021

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आ… बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्य… …ाचार्य डॉ.सुनंदा तिडके यांनी बोलत असतांना जननायक बिरसा मुंडा यांच्या विचाराची आज सुध्दा देशा… नितांत आवश्यकता आहे असे प्रतिपादन केले. बिरसा मुंडा यांनी जनतेमध्ये चेतना निर्माण करुन …वातंत्रयाचा एल्गार पुकारला. त्यांना इंग्रजांनी त्यासाठी तुरुंगात डांबले. त्यांनी समाज जागृतीची निर्माण …ली असे प्रतिपादन अभिवादन करत असतांना केले.

सुत्रसंचलन प्रा.डॉ.ज्योती धर्माधिकारी यांनी केले तर आभार प्रा.सचिन जयस्वाल यांनी मानले.

**प्राचार्य**

**डॉ. सुनंदा तिडके**

दिनांक :- 25/11/2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ____________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात
## स्व.यशवंतराव चव्हाण यांची पुण्यतिथी साजरी

जालना - दिनांक 25.11.2021

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय येथे दि.25.11.2021 रोजी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या होत्या. तर प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.प्रमोद ढोकणे हे होते.

मनोगत व्यक्त करत असतांना डॉ.प्रमोद ढोकणे असे म्हणाले की, यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होते. अधुनिक महाराष्ट्रासाठी धोरणात्मक निर्णय त्यांनी घेतले होते. रस्ते उभारणी, विज प्रकल्प आणि कोयना धरण प्रकल्प यशस्वीपणे राबविले.महाराष्ट्राला सुजलम सुफलम करण्यामध्ये त्यांचे फार मोठे योगदान आहे. त्यांनी देशपातळीवर सुध्दा उप पंतप्रधान, संरक्षण मंत्री आणि काँग्रेस पक्षामध्ये महत्वाच्या पदावर काम केले. पुणे करारामध्ये महाराष्ट्रात काँगेससाठी सामनजस्य घडून आणण्यासाठी त्यांचे योगदान होते.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके यांनी स्व.यशवंतराव चव्हाण हे अधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार होते. नवमहाराष्ट्र निर्मितीमध्ये वैचारीक,राजकीय,सांस्कृतिक तसेच साहित्यीक भरण पोषण करण्याचे काम यशवंतरावजींनी केले.त्यांची वैचारीक अधिष्ठान आणि साहित्या त्यांना आवड होती. कृष्णकाठ हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिध्द आहे. त्यांच्या जिवनकार्याचा परिचय देणारे समृध्द ग्रंथरुपी ठेवा आहे. त्यांनी अनेक धोरणात्मक निर्णय राबवुन आपल्या कार्याची छाप सोडली आहे. आपले काम प्रामाणिकपणे करणे हीच त्यांना श्रध्दांजली ठरेल असे मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.गोवर्धन खेडकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.शेख वाहब यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला महाविदयालयातील विदयार्थी,प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी हे मोठया संख्येने उपस्थित होते.

प्राचार्य

दिनांक :- 24/11/2021

ने,
संपादक साहेब,
नेक ____________
लना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात
## कै.श्रीमंतराव मुंढे अंतर महाविदयालयीन वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन

जालना दि.24.11.2021 भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई संचलित राष्ट्रमाता इंदिरा गांधी विदयालय जालना येथे दि.26.11.2021 रोजी, भारतीय स्वातंत्रयाचा अमृत महोत्सव व भारतीय धान दिनानिमित्त **कै.श्रीमंतराव मुंढे अंतर** महाविदयालयीन **वाद-विवाद स्पर्धेचे** आयोजन करण्यात ले आहे. **स्पर्धेचा विषय - जातीनिहाय जनगणना आवश्यक आहे का ? होय /नाही** हा आहे. यामध्ये ाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविदयालयातील **संघाने सहभागी व्हायचे** हन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे उदघाटन मा.श्री.नानासाहेब चव्हाण (जिल्हा उपनिबंधक जालना) यांच्या हस्ते होणार . कार्यक्रमाचे **अध्यक्ष**, मा.आ.डॉ. नारायणरावजी मुंढे साहेब (प्रथम मंडल स्तंभ निर्माते, अध्यक्ष ान **शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई**) हे राहणार आहेत. प्रमुख उपस्थिती मा.प्रा.सत्संग मुंढे (सरचिटणिस, ाष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी, महाराष्ट्र, उपाध्यक्ष भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई) व र्या डॉ.सुनंदा तिडके हे आहेत. स्पर्धा संपल्यानंतर यशस्वी स्पर्धकास बक्षिस वितरण होणार आहे. स वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे मा.श्री. सुभाष बोंद्रे साहेब (महाव्यवस्थापक **दैनिक** दिव्यमराठी, ाष्ट्र राज्य.) या कार्यक्रमाचे **अध्यक्ष** मा.आ. डॉ.नारायणरावजी मुंढे तसेच प्रा. सत्संग मुंढे हे राहणार

या कार्यक्रमाला विदयापीठ कार्यक्षेत्रातील मान्यवर संघ हजेरी लावणार आहे. या कार्यक्रमाला ीत जास्त संख्येने शहरातील बुध्दीजीवी वर्ग, मान्यवर, सुजान नागरीक आणि विदयार्थी यांनी थत राहून स्पर्धा यशस्वी करावी असे अवाहन प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके, प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे, .नवनाथ शिंदे, प्रा.डॉ.उमेश मुंढे, प्रा.षाजी सहदेवन,प्रा.डॉ.विक्रम दहिफळे, प्रा.डॉ.शोभा यशवंते, .गौतम वाकळे, प्रा.डॉ.संतोष देशपांडे यांनी केले आहे.

24-11-2021

प्राचार्य
डॉ. सुनंदा तिडके
PRINCIPAL

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात

## कै.श्रीमंतराव मुंढे आंतर महाविदयालयीन वादविवाद स्पर्धा संपन्न

जालना - दिनांक 26.11.2021

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय येथे दि.26.11.2021 रोजी भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई संचलित, राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय जालना येथे भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व भारतीय संविधान गौरव दिनानिमित्त कै.श्रीमंतराव मुंढे वादविवाद स्पर्धा संपन्न झाली.

उदघाटन समारंभाचे अध्यक्ष मा.आ.डॉ.नारायणराव मुंढे, संस्थापक अध्यक्ष भ.शि.प्र.मंडळ गेवराई, प्रथम मंडल स्तंभ निर्माते हे होते. प्रमुख उपस्थिती मा.प्रा.सत्संग मुंढे, उपाध्यक्ष भ.शि.प्र.म., मा.सुघोष मुंढे सचिव,भ.शि.प्र.मंडळ गेवराई, मा.अरविंदराव मुंढे, सहसचिव,भ.शि.प्र.मं., प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके, डॉ.सोमीनाथ खाडे, श्री.भास्कर शिंदे, श्री.कराड सर हे होते. यावेळी भारतीय संविधानाला पुष्पहार अर्पण करण्यात आला तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर,श्रीमती इंदिरा गांधी, ह.भ.प. भगवान बाबा व कै.श्रीमंतराव मुंढे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आणि दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके यांनी प्रास्ताविकामध्ये स्पर्धा आयोजना मागची भूमिका विशद केली.सध्या समाजामध्ये असणारे ज्वलंत प्रश्न, विषय व सामाजिक परिस्थिती यावर सांगोपांग विचार मंथन व्हावे या उददेशाने संस्था गेल्या 25 वर्षापासून ही स्पर्धा देशातील नामवंत विचारवंत आणि विदयार्थी यांच्या व्दारे विचार मंथन घडवुन आणत आहे. जातीनिहाय जनगणना ही काळाची गरज आहे/ नाही. या विषयी स्पर्धकानी आपले विचार व्यक्त करुन समाजाला एक नवी दिशा नवा विचार मांडावा असे अवाहन केले आणि स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

उदघाटन समारंभास मार्गदर्शन करत असतांना मा.आ.डॉ.नारायणरावजी मुंढे साहेब यांनी शैक्षणिक तळमळ आणि शिक्षणाव्दारे सामाजिक न्यायाची भूमिका हा संस्था स्थापनेचा व स्पर्धेचा प्रेरणा स्तोत्र असे सांगितले. शिक्षणामुळे सामाजिक न्याय मिळेल हे ब्रीद असून सामाजिक परिस्थिती बदलण्यासाठी जातीनिहाय जनगणना होणे ही काळाची गरज आहे. आणि ही जनचळवळ व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यासाठी तरुणांनी संघर्ष करावा असे अवाहन केले. आणि स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. उदघाटन समारंभाचे सुत्रसंचलन डॉ.नवनाथ शिंदे यांनी केले. या स्पर्धमध्ये विदयार्थ्यांनी विषयाच्या अनुकुल आणि प्रतिकुल बाजुने हिरेरीने आपले मत मांडले डॉ.बाबासाहेब मराठवाडा विदयापीठ औरंगाबाद कार्यक्षेत्रातील 10 स्पर्धक सहभागी झाले होते

या बक्षिस वितरण समारंभाचे अध्यक्ष मा.आ.डॉ.नारायणराव मुंढे साहेब, मा.प्रा.सत्संग मुंढे, उपाध्यक्ष भ.शि.प्र.म., सरचिटणिस महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस,। मा.श्री.सुभाषजी बोंद्रे, महाव्यवस्थापक दै.दिव्यमराठी महाराष्ट्र राज्य.मा.श्री.ज्ञानेश्वर देवकते,दै.दिव्यमराठी शहरप्रमुख,मा.विठ्ठल देंडगे, ,मा.सुघोष मुंढे, मा.अरविंदराव मुंढे, प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके,श्री.बी.के. शिंदे,श्री.संजीव कसबे (स्पर्धा परीक्षक), श्रीमती प्रभा जाधव (स्पर्धा परीक्षक), प्रा.ज्ञानेश्वर नागरे हे उपस्थित होते.

बक्षिस वितरण समारंभामध्ये आपले मनोगत व्यक्त करत असतांना मा.सुभाष बोंद्रे असे म्हणाले की, स्पर्धा हया विदयार्थ्याचे व्यकतीमत्व घडवत असतात. आत्मविश्वास हा पुस्तकी ज्ञानासोबत आपले जिवन घडवत असतो. प्रिंट मिडीया, इलेक्ट्रॉनिक्स मिडिया प्रमाणेच सोशल मिडीया सुध्दा आपल्या जीवनाच्या जडणघडणीमध्ये महत्वाचे योगदान देत आहे त्याचा वापर सुज्ञपणे करावा. राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय हे असे एकमेव महाविदयालय आहे की, जे समाजाचे, दलित,शोषितांचे विषय मांडून असे उपक्रम राबवत आहे.

यावेळी मा.आ.डॉ.नारायणराव मुंढे यांनी यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन केले यांना शुभेच्छा दिल्या. संघर्ष करायला पाहिजे संघर्षानेच न्याय मिळेल आणि त्यामुळे राष्ट्र बलवान होईल. शाळा कॉलेज हे संघर्षाचे केंद्र बनले पाहीजे. तरुणांनी चळवळ करुन आपले न्याय हक्क मिळवावे असे अवाहन केले.

बक्षिस वितरण कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.लहुराव दरगुडे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.सोमीनाथ खाडे यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी वादविवाद समिती सदस्य प्रा.डॉ.नवनाथ शिंदे, प्रा.डॉ.उमेश मुंढे, प्रा.षाजी सहदेवन, प्रा.डॉ.विक्रम दहिफळे, प्रा.डॉ.शोभा यशवंते, प्रसिध्दी प्रमुख प्रा.डॉ.गौतम वाकळे, डॉ.संतोश देशपांडे यांनी परीश्रम घेतले. यावेळी शहरातील सुजान नागरीक, पालक, विदयार्थी, प्राध्यापक, कर्मचारी, मोठया संख्येने उपस्थित होते.

प्राचार्य
डॉ. सुनंदा तिडके
PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna.

दिनांक :- 29/11/2021

प्रति,

.संपादक साहेब,

दैनिक ____________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

**राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात**

**महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी निमित्त अभिवादन**

जालना दि.28.11.2021

जालना येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी समारंभाचे आयोजन करण्यात आले. म.फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यावेळी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके या अध्यक्ष म्हणून तर प्रा.डॉ.नवनाथ शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रा.शिंदे यांनी महात्मा फुले यांच्या जिवनावर प्रकाश टाकला. त्यांनी समाजातील अनिष्ठ रुढी परंपरा विरुध्द आवाज उठविला. ते थोर समाज शास्त्रज्ञ होते. त्यांनी सतीप्रथा, स्त्री असमानतेच्या प्रश्नावर मोठे कार्य केले. शेतक-यांसाठी जनजागृती करुन शेतक-यांचा आसूड या ग्रंथामधून त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. दलित,अश्प्रूश्य यांना समान अधिकार मिळावा म्हणून त्यांनी स्वत:चा हौद पाण्यासाठी सर्वांना खूला करुन दिला असे सांगितले.

अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके यांनी केले. त्या असे म्हणाल्या की, महात्मा फुले हे मानवी समानता आणि स्वातंत्र्य यासाठी आयुष्यभर लढले. स्त्रीयांनी शिक्षण घ्यावे म्हणून त्यांनी सर्वप्रथम आपल्या पत्नीला शिकविले आणि स्त्री शिक्षणाची मूहुर्तमेढ रोवली.

केसवपन, स्त्री मुक्ती समानता मानवी मूल्य यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला ते दिनदुबळयांचे कैवारी होते. गरीबाविषयी उदारमतवादी भूमिकेतुन आपण कार्य करावे ही महात्मा फुलेंना श्रध्दांजली ठरेल असे महात्मा फुले यांना अभिवादन करत असतांना प्राचार्य डॉ.तिडके यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.विजय तिडके यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.विजयमाला घुगे यांनी मानले. यावेळी महाविदयालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

for Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College Jalna

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात युवा स्वास्थ मिशन अंतर्गत लसिकरण शिबिर संपन्न



जालना (प्रतिनिधी) : राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना येथे मिशन युवा स्वास्थ अंतर्गत कोविड-१९ लसिकरणाचे उद्घाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. नारायणराव मुंढे यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिड़के यांची प्रमुख उपस्थिती होती. लसिकरण शिबिराला जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने पुजा गेडाम, सुनिल घनसावंत, डॉ. शिवाजी आसाबे, अर्चना घोटकर, ज्योती कुलकर्णी, भाले आर्दीची उपस्थिती होती. सदर लसीकरण कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय यांच्या संयुक्त विदयमाने करण्यात आले. शिबिर उद्घाटन प्रास्ताविक प्रसंगी प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांनी कोविड-१९ चे भिषण वास्तव कथन केले. हे सर्व आपण अनुभवलेच आहे. यावेळी आपले आत्मजन सहकारी आणि कोरोना योद्धे आपण गमावले आहेत. अशा बिकट प्रसंगी सर्व जग कर्मचारी, पोलीस कर्मचारी, आशा वर्कर्स हे देतदूता प्रमाणे समाजाच्या कामी आले त्याबददल समाजाच्या वतीने त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप संस्थेचे अध्यक्ष आणि कार्यक्रमाचे उदघाटक मा. आ. डॉ. नारायणराव मुंढे यांनी केला ते असे म्हणाले की, व्यक्तींच्या जन्मापासून ते मरणापर्यत डॉक्टर है देवदूताप्रमाणे आपल्या सोबत असतात त्यांची प्रतिमा फार मोठी आहे. डॉक्टरच्या पवित्र कार्याबददल सर्वांनी कृतज्ञ राहिले पाहिजे असे त्यांनी अवाहन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचल रा. से. यो कार्यक्रमाधिकारी प्रा. भिमराव वाघ तर आभार प्रदर्शन रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. आलिया कौसर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रा. से. यो जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे आणि रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. विठ्ठल गाडेकर यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमास महाविदयालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी आणि विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत

दिव्य मराठी नोव्हेंबर २०२१

## सरदार वल्लभभाई पटेल यांना अभिवादन

जालना : शहरातील इंदिरा गांधी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी आमदार डॉ. नारायणराव मुंढे, प्रा. सत्संग मुंढे, सुबोध मुंढे, प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके, डॉ. ज्योती धर्माधिकारी, प्रा. सचिन जयस्वाल यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

लोकमत दि. ०८/११/२०२१

षिकांचे वितरण...



पारितोषिकांचे वितरण करताना मीनाक्षी दाड, प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके व इतर.

## वक्तृत्व स्पर्धेमध्ये २८ विद्यार्थ्यांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

जालना : लायन्स क्लब आणि राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयाच्या वतीने ललकार कार्यक्रमांतर्गत आयोजित वक्तृत्व स्पर्धेत २८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्लबच्या अध्यक्ष मीनाक्षी दाड, प्राचार्य सुनंदा तिडके, विजय दाड, प्रकल्प प्रमुख प्रकाश कुंडलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मीनाक्षी दाड, प्रकाश कुंडलकर, डॉ. सुनंदा तिडके यांनी मार्गदर्शन केले. या स्पर्धेत अश्विनी किसन घुगे (प्रथम), वर्षा देवसिंग घुसिंगे (द्वितीय), अदिती सुरंगळीकर (तृतीय), हर्षल अंबादास व्यवहारे याने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकाविले. परीक्षक म्हणून शिक्षिका शिवनंदा मेहेत्रे, ज्योत्स्ना बिडकर, जयश्री डोईफोडे यांनी काम पाहिले. यावेळी विद्यार्थी उपस्थित होते.




# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात युवा ललकार कार्यक्रमांतर्गत वक्तृत्व सपर्धा संपन्न

**जालना, दि. ०४ डिसेंबर-**

जालना येथल राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय जालना येथे दि.०३ डिसेंबर २०२१ रोजी लॉयन्स क्लब ऑफ जालना यांच्या संयुक्त विदयमाने युवा ललकार कार्यक्रमांतर्गत वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके व प्रमुख पाहुणे लॉ.मिनाक्षी दाड (लॉयन्य क्लब ऑफ जालना अध्यक्ष) लॉ.संजय दाड, लॉ. प्रकाश कुंडलकर (प्रकल्प प्रमुख), प्रा. विठठल गाडेकर इत्यादींची उदघाटन प्रसंगी उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांनी मार्गदर्शनपर विचार मांडले. या स्पर्धेमध्ये एकुण १८ स्पर्धकाने सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या पारितोषिक वितरण प्रसंगी प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके, प्रमुख पाहुणे लॉ. मिनाक्षी दाड, लॉ. संजय दाड यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. या निमित्ताने बक्षिस वितरण प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके, लॉ. मिनाक्षी दाड, लॉ. संजय दाड, लॉ. प्रकाश कुंडलकर व परीक्षक व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रथम, व्दितिय व तृतीय व उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले. त्यामध्ये कु. आश्विनी किसन घुगे (प्रथम) शा. तंत्र निकेतन नागेवाडी जालना, कु. वर्षा देवसिंग घुसिंगे (व्दितीय) जेईएस महा.जालना, कु. आदिती सुरंगळीकर (तृतिय) बारवाले महाविदयालय जालना., [illegible] व्यवहारे (उत्तेजनार्थ, डॉ. बा. आं. म. वि. औरंगाबाद) यांनी प्राप्त केले. या स्पर्धेचे परीक्षक डॉ. शिवानंद हरकळ, श्रीमती बिडकर, श्रीमती [illegible]

# र गांधी महाविद्यालयात युवा
# ंतर्गत लसिकरण शिबिर संपन्न



दिनांक :- 6/12/2021

प्रति,

.संपादक साहेब,

दैनिक ____________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

**राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनी आदरांजली**

दि. 6 डिसेंबर 2021 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. डॉ.बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.लहु दरगुडे व श्री.अर्जुन भाबड हे उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे प्रा.एल.बी. दरगुडे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रयावर प्रकाश टाकला. संविधान निर्माण करण्याकरीता त्यांनी विविध देशाच्या राज्यघटनेचा अभ्यास केला व आपल्या भारतीय नागरीकांना स्वाभिमानाने जीवन जगता यावे व प्रत्येक व्यक्तीस संधीची समानता मिळावी यासाठी प्रयत्न केले तसेच स्पृश्य-अश्पृशांची दरी कमी करण्याकरीता जीवनाचा बराच वेळ खर्च केला असे सांगितले.

महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपूर्ण जीवन कार्यावार प्रकाश टाकत अनेक उदयांना स्पर्श केला जसे गोलमेज परिषदेत स्वतंत्र मतदार संघाची मागणी, संविधान निर्मिती, शिक्षण व आरोग्य सर्वांना मोफत मिळावे यासाठी केलेले प्रयत्न, स्त्रीयांच्या हक्काची जाणीव, एक व्यक्ती एक मत, समाज अधिकार, घटनेतील मार्गदर्शक तत्वे इ. तसेच आज जे ओबीसी मधील लोक फा नोकरी क्षेत्रात दिसतात ते बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेत तरतुद केलेल्या तत्वानूसार. सामाजिक, अर्थिक, राजकीय कार्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर गुतुंन गेले असते तर दलित,शाषित, वंचितांसाठी विशेष कार्य करता आले नसते. असे त्या म्हणाल्या.

या प्रसंगी सुत्रसंचालन प्रा.रामनाथ पालवे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.सोपान चव्हाण यांनी मानले. या प्रसंगी धडाडीचे कार्यकर्ते व अभ्यासू व शिक्षक संघटनेचे अध्यक्ष डॉ.उत्तम सुर्यवंशी यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमास प्राध्यापक वृंद, विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

प्राचार्या

प्रति

दि. ९.१२.२०२१

दिनांक :- 9/12/2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ____________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## मानसिक गुलामगिरीत जगत असलेल्या स्त्रियांना मानव अधिकार मिळाला पाहिजे

## - प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके

दिनांक 9.12.2021 रोजी जागतिक मानव अधिकार दिन राज्यशास्त्र विभागातर्फे राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात संपन्न झाला.

या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके हया होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून जमाते रस्लामीचे सचिव शेख मुजीब व जमाते इस्लामी चे अध्यक्ष शेख इस्माइल तसेच शेख मुशताक जमायते इस्लामी चे सदस्य हे उपस्थित होते.

या प्रसंगी राज्यशास्त्र विभागाचे प्रा.सचिन जयस्वाल यांनी प्रास्तावना केली व जागतिक मानव अधिकार दिन 10 डिसेंबर रोजी असल्यामुळे हा कार्यक्रम संपन्न होत आहे असे सांगितले.

या कार्यक्रमास महाविदयालयाचे विदयार्थी, प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

प्राचार्या

दिनांक :- 13/12/2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ____________________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात
## लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंढे साहेब यांची जयंती साजरी

दिनांक 12.12.2021 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय जालना येथे लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंढे साहेब यांची जयंती महाविदयालयात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष मा.प्रा.सत्संग मुंढे हे होते व प्रमुख वक्ते / पाहुणे म्हणून प्रा.भिमराव वाघ हे होते. पाहुण्यांनी सर्व प्रथम लोकनेत गोपीनाथराव मुंढे साहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले व मा.सत्संग मुंढे सर यांनी स्व.गोपीनाथराव मुंढे यांच्या जीवनकार्याचा थोडक्यात आढावा घेवून त्यांची सामाजिक, राजकीय कारकीर्द यावर प्रकाश टाकून मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुणे प्रा.भिमराव वाघ यांनी मुंढे साहेबांचे जीवन चरित्र मांडले व त्यांनी केलेले ओबीसींचे कार्ये व राजकीय कार्ये यावर सखोल मार्गदर्शन केले.

या प्रसंगी महाविदयालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.लहुराव दरगुडे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.संतोष देशपांडे यांनी मानले.

**प्राचार्य**

**डॉ. सुनंदा तिडके**

दि. 13 डिसेंबर 2021

प्रति

______

लोकनेते कै. गोपिनाथराव मुंडे यांना विनम्र अभिवादन

दि. 12 डिसेंबर रोजी लोकनेते गोपिनाथराव मुंडे यांना राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात विनम्र अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव व प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस श्री राजेसाहेब मुंडे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. बी. डी. वाघ हे होते. सूत्रसंचालन प्रा. दरगुडे बी. एल. यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. संतोष देशपांडे यांनी केले.

या प्रसंगी प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दिनांक :- 20/12/2021

प्रति,
मा.संपादक साहेब,
दैनिक ____________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

**राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात**

**स्वच्छतेचे पुजारी श्रीसंत गाडगे महाराज यांची पुण्यतीथी उत्साहात साजरी**

दिनांक 20.12.2021 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात संत गाडगे महाराज यांच्या पुण्यतीथी कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या प्रसंगी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी अध्यक्षस्थान स्विकारले तर प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.निशिकांत लोखंडे हे होते.यावेळी प्राचार्यानी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करुन संत गाडगे बाबा यांनी बाहय स्वच्छताच केली नाही तर अंतर मनाचीही स्वच्छता केली. तसेच त्यांनी जनजागृती करुन लोकांचे प्रबोधन केले असे त्या म्हणाल्या.

प्रमुख पाहुण्यांनी गाडगे महाराज सारखे जागृत संत निर्माण व्हायला हवे असे सांगितले. याप्रसंगी प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे यांनी सुत्रसंचलन करुन आभार मानले. या कार्यक्रमास महाविदयालयातील प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्त्र कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन प्रा.सचिन जयस्वाल यांनी केले.

प्राचार्य
डॉ. सुनंदा तिडके

दिनांक :- 07/01/2022

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ________________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात
# लसिकरण शिबिर संपन्न

दिनांक 06.01.2022 व 07.01.2022 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात 15 ते 18 वयोगटातील विदयार्थ्यांना कोव्हॅक्सिन लस देण्यात आली. जगभरामध्ये कोविड-19 ची साथ सुरु असल्यामुळे अनेक लोक मुत्यूमुखी पडत आहेत. महाविदयालयीन विदयार्थ्यांना याचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून लसिकरण शिबिर घेण्यात आले.

दि.06.01.2022 रोजी अप्पर जिल्हाधिकारी साहेब श्री. पिटके सर व उपजिल्हाधिकारी साहेब श्री.बिनाटे सर यांनी लसिकरण शिबिराला महाविदयालयात भेट दिली.

लसिकरणाचा हा स्तुत्य उपक्रम महाविदयालयात राबवल्या जात आहे ही विदयार्थ्याच्या दृष्टीने महत्वाची बाब आहे असे श्री.बिनाटे यांनी सांगितले. कोविड-19 सारख्या भयानक महामारी वर व्हॅक्सीनेशन व सुरक्षित अंतरामूळे आळा बसू शकेल असे श्री. पिटके साहेब म्हणाले.

याप्रसंगी पवन सत्संग मुंढे, श्री.अनिकेत मुंढे, श्री.अर्जुन भाबड (का.अधिक्षक),प्रा.विठठल गाडेकर हे उपस्थित होते.

लसिकरण शिबीरासाठी दि.07.01.2022 रोजी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांची (प्रमुख उपस्थिती) होती. तसेच महाविदयालयातील डॉ.सोमीनाथ खाडे,डॉ.चव्हाण एस.टी., डॉ.प्रमोद चव्हाण, डॉ.प्रताप रामपूरे,प्रा.शोभा गायकवाड,प्रा.विजय तिडके, प्रा.लहू दरगुडे,प्रा.बी.डी.वाघ, श्रीमती प्रमिला मोरे,श्रीमती सानप व्ही.एन.,श्रीमती ज्योती कुलकर्णी,श्री.शिवाजी माळी इ. उपस्थित होते.व डॉ.जी.बी.काळे व डॉ.व्ही.एस.चव्हाण यांनी लसिकरण शिबिराला भेट दिली.

हया लसिकरणात एकूण 200 विदयार्थ्यांचे लसिकरण करण्यात आले.शासकीय जिल्हा रुग्णालय व राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयाल,राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विदयमाने हा कार्यक्रम घेण्यात आला.

PRINCIPAL
प्राचार्य
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College Jalna.

दिनांक :- 12/01/2022

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ____________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

**आधुनिक युगात स्त्री व पुरुष यांनी मिळून संस्कार करावेत.**

**- प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके**

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात राजमाता जिजाऊ व राष्ट्रभक्त स्वामी विवेकानंद यांची जयंती दि.12.01.2022 रोजी संपन्न झाली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा.डॉ.सविता मुंढे व प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे हे होते. विशेष उपस्थिती महाविदयालयाचे का.अधिक्षक श्री.अर्जुन भाबड हे होते.

डॉ.सविता मुंढे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, जिजामाता हया संस्काराचे विदयापीठ होत्या. त्यांनी शिवाजी महारजांवर जन्मा अगोदर पासून संस्कार केले होते.शहाजी राजांच्या मागे त्या खंबीरपणे उभ्या होत्या.दुस-यांची चाकरी करण्यापेक्षा आपले असे स्वराज्य असावे असे त्यांना वाटत असे. दैव्यवादयाकडे न वळता बुध्दी प्रामाण्यवादयाकडे वळल्या व शिवाजींना राज्यभिषेक करावयास सांगितले. जिजाऊचे चरित्र वाचून आपल्याला प्रसंगाला तोंड देण्याची प्रेरणा मिळते व आकाशाला गवसणी घालता येते असे त्या म्हणाल्या.

प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे यांनी आपले मत मांडतांना सांगितले की, स्वामी विवेकानंदाच्या चरित्रयावर प्रकाश टाकला.ध्यास,साधना व त्याग यांच्या जीवनाचा सार होता.याचे विविध उदाहरणे त्यांनी दिले. स्वामी विवेकानंद एकाग्र बुध्दीचे होते. ते पुस्तके एकदा वाचलं की त्यांना तोंडपाठ होत होते. ते कधीच निराश होत नव्हते.वैराग्य त्यांच्या जीवनाचा गाथा होता. जगाच्या संस्कृतीला माझ्या बंधूनों व भगिनींनी असे शब्द दिले जे भारताच्या सांस्कृतित होते.जनसेवा हाच खरा धर्म आहे. ख-या धर्माला,जातीयतेला स्थान नाही. त्यांच्या जीवनात त्यांनी आईला खूप आदरणीय मानले. प्रत्येक संकटापासून पळून न जाता खंबीरपणे तोंड देता आले पाहीजे हे स्वामी विवेकानंदाच्या चरित्रयातून आपण शिकतो असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके यांनी सांगितले की, जिजाऊ यांनी स्त्रीयांना खुप मानाचे स्थान दिले व स्त्रीयांवर अत्याचार करणा-यावर कठोर दंड देण्याचे संस्कार शिवाजी महाराजांवर केले. लोकशाही असतांना सुध्दा राजेशाहीची आठवण आपण शिवाजी महाराजांच्या पराक्रमामुळे काढतो. कुटुंबाचे संस्कार हे तुमच्या कार्यावर दिसत असतात. आपण दान केले पाहिजे. कोरोना काळात एका छोटया मूलीने केलेल्या मदतीचे उदाहरण त्यांनी दिले.आधुनिक युगात आई व वडिल यांनी मिळून संस्कार केले पाहीजे. परोपकारासाठी वेळे दिला पाहिजे असे संस्कार मुलांवर झाले पाहीजे. त्यांना त्यांचे स्वातंत्रय मिळाले पाहीजे. जातीयता ही वाईटच आहे ती नष्ट झाली पाहीजे. तरुणांच्या मनात हा विचार पेरला पाहीजे म्हणजे स्वामी विवेकानंदांना खरी आदरांजली ठरेल असे त्या म्हणाल्या.

याप्रसंगी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.आलिया कौसर यांनी केले तेर आभार प्रदर्शन प्रा.सचिन जयस्वाल यांनी मानले. याप्रसंगी प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विदयार्थी शासनाचे पूर्ण नियम पाळून उपस्थित होते.

ते,

मा.संपादक साहेब,

दैनिक ____________________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात भूगोल दिन साजरा

14 जानेवारी 2022 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात भूगोल दिन संपन्न झाला. पृथ्वीचा गोल या वेळेस सभागृहात ठेवण्यात आला होता.

याप्रसंगी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके हया अध्यक्ष होत्या तर प्रमूख पाहुणे म्हणून भूगोल विभागाचे प्रा.डॉ.प्रमोद ढोकणे हे उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रा.डॉ.सोमीनाथ खाडे, प्रा.भिमराव वाघ यांनी सहकार्य केले.

प्रा.डॉ.प्रमोद ढोकणे यांनी आपले विचार व्यक्त करतांना असे सांगितले की, भूगोल दिन जगामध्ये साजरा केला जातो. प्रा.सी.डी.देशमुख यांच्या नावाने हा साजरा केला जातो. निसर्ग व मानव अशी थिम ठेवली आहे व माणूस पर्यावरणाशी निगडीत असल्यामुळे निसर्गाचे संरक्षण हे झाले पाहीजे असे भूगोलाची भूमिका माणसाने अंगीकारली तर सर्व अंगाने त्याचा मानवाला फायदा होईल असे सांगितले.

अध्यक्षीय भाषणाणात महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी भूगोल दिनाच्या शुभेच्छा दिल्या व मानवाचे सर्व जीवन हे निसर्गाशी जोडलेले असल्यामुळे माणसाने त्याचे भान ठेवले पाहीजे.ऑक्सीजन लेव्हल जी कमी होत आहे ते वाढवण्याचा प्रयत्न मानवाने केला पाहीजे म्हणजे त्याच्यावर संकट येणार नाही असे त्या म्हणाल्या.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.विजय तिडके यांनी केले तर आभार डॉ.सोमीनाथ खाडे यांनी मानले.

याप्रसंगी प्रा.डॉ.नवनाथ शिंदे, श्रीमती शिलाताई खेडकर,प्रा.विजय तिडके,प्रा.सचिन जयस्वाल, प्रा.डॉ.शोभा यशवंते हे उपस्थित होते.

प्राचार्या

दिनांक :- 14/01/2022

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ____________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

**नामांतराची लढाई ही अस्तित्वाची व अस्मितेची लढाई होती.**

**- श्री.प्रकाश गडवे**

-

दि.14 जानेवारी 2022 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणुन श्री.प्रकाश गडवे,प्रा.डॉ.शोभा यशवंते हे होते.

प्रथमतः डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.आपल्या विषयाची मांडणी करत असतांना श्री.प्रकाश गडवे यांनी महाविदयालयात परिवर्तनाची चळवळी हया होत असतात ही एक चांगली गोष्ट आहे.नामांतराऐवजी नामविस्तार झाला. प्रत्येक विदयार्थी नितीवंत,गुणवंत बनावा असा डॉ.बाबासाहेबांचा विचार असल्यामूळे त्यांनी मिलींद महाविदयालय, विधी महाविदयालय व मराठवाडा विदयापीठाची स्थापना केली. केवळ नावासाठी विरोध करणे हे एक कमकुवत मानसिकतेचे प्रतिक होते. आज आम्ही एका विशिष्ट टप्यावर येऊन ठेपलो आहोत परंतू ही परिवर्तनवादी चळवळ पूढे होऊन जाण्यासाठी युवकांनी सज्ज झाले पाहीजे असे ते म्हणाले.

या प्रसंगी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी ही हे नामविस्तारासाठीचे योगदान हे महत्वपूर्ण होते व त्यासाठी अनेकांनी बलिदान दिले. आम्ही ही परिवर्तनवादी चळवळ पुढे नेऊ असेही त्या म्हणाल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ.गौतम वाकळे यांनी केले तर आभार प्रा.सचिन जयस्वाल यांनी मानले. या कार्यक्रमास शासनाचे पूर्ण नियम पाळून प्राध्यापक वृंद व विदयार्थी उपस्थित होते.

प्राचार्या

दिनांक :- 18/01/2022

प्रति,
मा.संपादक साहेब,
दैनिक ____________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

# संत भगवान बाबा हे कृतिशिल समाज सुधारक होते.

**- प्रा.रामनाथ पालवे**

संत भगवान बाबा पुण्यतिथी कार्यक्रम

दि.18.01.2022 रोजी संत भगवान बाबा पुण्यतिथी साजरी करण्यात आली. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.रामनाथ पालवे हे होते. मान्यवरांच्या संत भगवान बाबा यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

प्रा.पालवे यांनी आपल्या भाषणामध्ये संत भगवान बाबा यांच्या संतमय जीवनकार्याच्या लहानपणापासूनच्या आठवणी सांगितल्या. मुल्यसंस्काराचे शिक्षण भगवान बाबांनी दिले त्याची रुजवणूक सर्व समाजामध्ये केली.अध्यात्मीक,समाजिक संस्काराची शिकवण सर्व समाजाला दिली. समाज परिवर्तन घटविणारे हे थोर संत होते.बाबांनी कृतीतून शिक्षणाचे महत्व पटवून दिले. शिक्षणासाठी त्यांनी शाळा सुरु केल्या. व सर्व समावेशक मुलांना शिक्षण दया हे त्यांनी सर्वांना सांगितले आहे.अंधश्रध्दा व अनेक अनिष्ठ रुढी परंपरांना बंद केल्या.

अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी आपले विचार व्यक्त करतांना संत भगवान बाबा यांच्या जीवन चरित्रयाविषयी बोलतांना भगवान बाबांच्या शैक्षणिक सामाजिक पैलुवर प्रकाश टाकला. येणा-या पिठीने हे जे ज्ञान आहे त्याचे पवित्रय टिकविले पाहिजे. लोकांना शिक्षण दिले गेले पाहिजेत शोषित,वंचित पिडीत यांना जिव्हाळा लावा त्यांच्यापर्यंत शिक्षण पोहचवा हीच खरी भगवान बाबांना श्रध्दांजली होय.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.अभिमन्यू बिक्कड यांनी केले त्यांनी भगवान बाबांच्या आठवणी आपल्या खुमासदार हिंदी भाषेत केले व सर्वांना मंत्रमुगध केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.विठठल गाडेकर यांनी केले. शासनाचे पूर्ण नियम पाळून हा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विदयार्थी उपस्थित होते.

दिनांक :- 23/01/2022

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ____________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

**राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात**

**नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी**

दि.23 जानेवारी 2022 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय जालना येथे नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती पुष्पहार अर्पण करुन करण्यात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी क्रिडा विभाग प्रमुख डॉ.प्रताप रामपूरे हे अध्यक्ष म्हणून होते तर प्रमूख पाहुणे प्रा.भिमराव वाघ हे होते. या प्रसंगी प्रमूख पाहुणे प्रा.भिमराव वाघ यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावर प्रकाश टाकला व भारत देशाला एक सच्चे सूपूत्र म्हणून नेताजींचा उल्लेख केला.

आपल्या अध्यक्षीय समारोपात डॉ.प्रताप रामपूरे यांनी देशभक्त नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी अभिवादन केले व अशा देशभक्तांची गरज आजही भारत देशाला आहे असे सांगितले.

याप्रसंगी सूत्रसंचलन वनस्पतीशास्त्र विभाग प्रमूख प्रा.डॉ.एस.टी.चव्हाण यांनी केले तर आभार प्रा.एल.बी.दरगुडे यांनी मानले. या प्रसंगी प्रा.डॉ.संतोष देशपांडे, श्रीमती शिलाताई खेडकर आदींची उपस्थिती होती.

हा कार्यक्रमास शासनाचे पूर्ण नियम पाळून संपन्न झाला.

प्राचार्य

दिनाक - 26/01/2022

ति,

ा.संपादक साहेब,

निक ______________

ालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात
## प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहन

दिनांक 26 जानेवारी 2022 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय जालना येथे
जासत्ताक दिना निमित्य ध्वजारोहन करण्यात आले.

या प्रजासत्ताक दिनी भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई संचलित, राष्ट्रमाता इंदिरा
ांधी महाविदयालयाचे उपाध्यक्ष मा.प्रा.सत्संग नारायणराव मुंढे सर यांच्या हस्ते ध्वजारोहन
करण्यात आले. या प्रसंगी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

यापसंगी मा.पवन सत्संग मुंढे,श्री.भावड ऐ.पी. का.अधिक्षक व माजी का.अधिक्षक
श्री.बी.के. शिंदे हे उपस्थित होते.

ध्वजारोहनाचे संचलन क्रिडा विभाग प्रमूख प्रा.डॉ.प्रताप रामपूरे यांनी केले.

या कार्यक्रमास प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी व विदयार्थी शासनाचे पूर्ण नियम
पाळून उपस्थित होते.

प्राचार्या
डॉ. सुनंदा तिडके

दिनांक :- 10/02/2022

ति,
ा.संपादक साहेब,
निक ____________
ालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात श्रध्दांजली

दिनांक 10.02.2022 रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात गानकोकिळा, भारतरत्न लता मंगेशकर यांना ऑफ लाईन व ऑनलाईन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

या प्रसंगी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके हया उपस्थित होत्या. तसेच श्री.भाबड ए.पी. हे उपस्थित होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठा अंतर्गत एन.एस.एस.विभागाचे जालना जिल्हयाचे समन्वयक डॉ.सोमिनाथ खाडे व सांस्कृतिक विभाग प्रमूख प्रा.विठठल गाडेकर हे उपस्थित होते. त्याच प्रमाणे महाविदयालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. ऑनलाईन व ऑफलाईन श्रध्दांजली कार्यक्रमास 278 उपस्थित होते.

प्राचार्या

दिनांक :- 15/02/2022

प्रति,
मा.संपादक साहेब,
दैनिक ________________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात
## श्रीसंत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात दि.15.02.2022 रोजी श्रीसंत सेवालाल महाराज यांची जयंती पुष्पहार अर्पण करुन साजरी करण्यात आली.

या प्रसंगी महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या तर प्रमुख पाहुणे प्रा.विजय मुंढे हे उपस्थित होते. याप्रसंगी प्रा.विजय मुंढे यांनी श्रीसंत सेवालाल महाराज यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

या प्रसंगी अंकुशराव टोपे महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.संभाजी पाटील यांचे अपघाती निधन झाले. ही दूरदैवी घटना दि.14.02.2022 रोजी झाली. महाविदयालयाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी त्यांच्या या दु:खद निधनामूळे शैक्षणिक क्षेत्रात दु:खाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांनी वेगवेगळया कमिटयावर काम केले व ते इतरांना नेहमी मदत करीत असत व तत्परतेने सुखदु:खात सहभागी होत असत असे सांगितले. तसेच त्यांच्या कुटुंबाच्या या दु:खात आमचे महाविदयालय सहभागी आहे असेही प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके म्हणाल्या.

या प्रसंगी आभार प्रदर्शन प्रा.विठठल गाडेकर यांनी केले तर सूत्रसंचलन प्रा.सचिन जयस्वाल यांनी केले. या कार्यक्रमास महाविदयालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विदयार्थी सहभागी झाले होते.

प्राचार्या

प्रति,
संपादक

दिनांक 16.02.2022

संत शिरोमणि गुरु रविदास हे आपल्या

कर्माने श्रेष्ठ होते

प्रा. बाजी सहदेवन

राजमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात दि. 16.02.2022 रोजी संत शिरोमणि गुरु रविदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी गुरु रविदास महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके ह्या अध्यक्ष तर प्रमुख पाहुणे प्रा. बाजी सहदेवन हे उपस्थित होते.

प्रा. बाजी सहदेवन यांनी महापुरुष हे कुठल्याही चौकटीत बसत नसतात ते धर्म, जात, पंथ, संप्रदाय, देश, भाषा यांच्या पलिकडे जाऊन अखिल मानवतेसाठी कार्य करित असतात असे सांगितले. या प्रसंगी प्रा. डॉ. शोभा यशवंते यांनी आपले विचार मांडतांना सांगितले की; रविदास महाराज विद्वानांबरोबर शास्त्रार्थ करायचे व त्या काळी शिक्षण नसतांना सुद्धा प्रभाविपणे आपले विचार मांडायचे. संत मीराबाई ~~संत~~ ~~कबीर~~ ह्या त्यांच्या शिष्य होत्या. अनेक आख्यायिका त्यांच्या जीवनाशी जोडल्या आहेत उदा. भक्त पुंडलिक, संत मीराबाई, कंगण विषयक इत्यादी.

~~अध्यक्ष~~ प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांनी आपल्या भाषणात 'मन चंगा तो कठौती में गंगा' हे सत्यवचन सांगतांना प्रत्येकाने आपले मन व अंत:करण शुद्ध ठेवून वागावे म्हणजे प्रत्येक क्षेत्रात चांगली माणसे निर्माण होतील असे सांगितले

या प्रसंगी श्री वसंत हनुवते हे ही उपस्थित होते तसेच डॉ. बा. आं. मराठवाडा महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिक्षक श्री भावड अर्जुन, डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठाचे ~~जालना~~ जालना जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. खाडे सोमिनाथ, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सचीन जयस्वाल व प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या प्रसंगी सूत्रसंचलन व आभार प्रा. विठ्ठल गाडेकर यांनी केले

(signature)

प्रति,

संपादक

माता रमाबाईंना अभिवादन

दि. ७ फेब्रु रोजी राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात महामानवाची सावली माता रमाबाईंना जयंती निमित्य अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी प्रा. डॉ. चव्हाण एस. टी. प्रा. डॉ. उमेश मुंढे, प्रा. डॉ. ढोकणे प्रमोद, श्री संजय मुंढे, श्री आगे इ. उपस्थित होते.

या प्रसंगी अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. ढोकणे प्रमोद हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. उमेश मुंढे हे होते. या प्रसंगी सूत्रसंचलन प्रा. डॉ. चव्हाण एस. टी. यांनी केले तर आभार श्री संजय मुंढे यांनी मानले.

प्रा. डॉ. उमेश मुंढे यांनी रमाईच्या जीवनावर प्रकाश टाकला. माता रमाईच्या त्यागाची तुलना कोणाशीही होणार नाही. महापुरुषाच्या म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनात रमाबाईंनी कधीही अडथळा आणला नाही व त्या कुटुंबाची सर्व जबाबदारी हाल अपेष्टा सहन करून उचलत असत. कितीही संकटे आली तरी त्या डगमगल्या नाहीत. डॉ. बाबासाहेबांनी खूप मोठे व्हावे व नाव कमवावे असे त्यांना वाटत होते. त्यांची साथ ही खुप महत्वाची होती असे सांगितले.

अध्यक्षिय समारोपात डॉ. ढोकणे यांनी सांगितले.

शासनाचे पूर्ण नियम पाळून हा कार्यक्रम घेण्यात आला.

दिनांक :- 23/02/2022

प्रति,
मा.संपादक साहेब,
दैनिक ____________
जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रमाता **इंदिरा गांधी** महाविदयालयात
## **संत गाडगे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी**

दि.23 फेब्रूवारी 2022 रोजी संत गाडगे महाराज यांच्या जयंतीचा कार्यक्रम संत गाडगे महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या होत्या. तर प्रमूख पाहुणे राज्यशास्त्र विभागाचे प्रा.सचिन जयस्वाल हे होते.

प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके या बोलत असतांना, संत गाडगे महाराजांच्या विचारांची व त्यांच्या स्वच्छतेविषयक विचारांची आजही गरज आहे असे विचार व्यक्त केले.

प्रमुख पाहुणे प्रा.सचिन जयस्वाल यांनी संत गाडगे महारांच्या जीवनावर प्रकाश टाकला तसेच

जतरे में बिठाया फतरा
तिरथ बनाया पानी
पैसे की धुलधाती
दुनियाँ भयी दिवानी असे

संत गाडगे महारांचे विचार होते. गोर-गरीबांनी आपल्या पैश्याची बचत केली पाहीजे, मुलांना शिकवले पाहिजे असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार डॉ.सोमीनाथ खाडे जालना जिल्हा एन.एस.एस. विभाग समन्वयक यांनी केले. याप्रसंगी का.अधिक्षक श्री.अर्जुन भाबड हेही उपस्थित होते. याप्रसंगी महाविदयालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विदयार्थी उपस्थित होते.

प्राचार्य

दि. २८ फेब्रु २०२२

# डॉ. रमण यांनी जगाला विज्ञानाचे महत्त्व पटवून दिले

प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे.

राष्ट्रमाता इंदिरागांधी महाविद्यालयात दि. २८ फेब्रु रोजी जागतिक विज्ञान दिन डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून साजरा करण्यात आला.

या प्रसंगी महाविद्यालयातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे एन. एस. एस. चे जालना जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे हे अध्यक्ष होते तर प्रमुख पाहुणे विज्ञान विभागाचे वनस्पती शास्त्राचे प्रमुख प्रा. डॉ. चव्हाण एस. टी. हे होते.

प्रा. डॉ. चव्हाण यांनी डॉ. रमण यांच्या जीवनावर प्रकाश टाकला व विज्ञानाची आज जी प्रगती आपण पहात आहोत या मध्ये थोर विज्ञान शास्त्रज्ञांचा फार मोठा वाटा आहे, योगदान आहे. अखिल मानव जातीने यांचे ऋणी राहयला पाहिजे व विद्यार्थ्यांनी नव-नविन संशोधन करायला हवे असे सांगितले.

डॉ. सोमीनाथ खाडे यांनी हा देश विभिन्नतेने नटलेला असून व देशात वेगवेगळ्या भाषा विकसित होत असून विज्ञानाचा प्रचार व प्रसार सोपा होत आहे. विविध विषयातील ज्ञान हे जगभर विखुरले होते पण सी. व्ही. रमण सारख्या शास्त्रज्ञांनी ते वेगवेगळ्या पातळीवर सर्वांसाठी खुले केले व विज्ञान क्षेत्रात भरीव संशोधन केले व जनतेसाठी आपले ज्ञान खुले केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. वाकडे यांनी केले. डॉ. वाकडे यांनी विज्ञान विभागातील वनस्पती शास्त्र विभागाने २८ फेब्रु रोजी मशरूम उत्पादनविषयक ऑनलाईन सेमीनार मध्ये विचार व्यक्त केले तसेच प्रा. डॉ. सोपान चव्हाण यांनीही या ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

जागतिक विज्ञान दिनाच्या कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. कोडगे यांनी मानले या वेळी प्रा. डॉ. शोभा परळने, प्रा. डॉ. खेडकर, प्रा. डॉ. शिंदे, प्रा. डॉ. उमेरा

ते,

सपादक साहेब,

िक ______________

लना.

दि. 23.02.2021

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

## राष्ट्रसंत गाडगे बाबा यांना अभिवादन करुन जयंती साजरी

जालना दि.23.02.2021 राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात राष्ट्रसंत गाडगे महाराज यांना यंती निमित्त अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. भगवान शिक्षण प्रसारक मंडळ गेवराईचे सचिव, प्रा.सत्संग मुंढे सर यांनी गाडगे बाबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला, आणि संत गाडगे बाबांच्या जीवनावर भाष्य केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ.खाडे एस.एस.यांनी मा.प्रा.सत्संग मुंढे यांचे स्वागत केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.विठ्ठल गाडेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.भिमराव वाघ यांनी केले. यावेळी महाविदयालयातील प्रा.डॉ.गौतम वाकळे, प्रा.डॉ.शोभा यशवंते,प्रा.डॉ.विक्रम दहिफळे, प्रा.पालवे,प्रा.डॉ.खेडकर, प्रा.डॉ.ढोकणे, प्रा.षाजी,प्रा.घुगे मॅडम,प्रा.विजय तिडके,प्रा.डॉ.गि-हे व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विदयार्थी उपस्थित होते.

कोव्हीड-19 नियमांचे पालन करुन कार्यक्रम संपन्न झाला.

Bjedkr 23-02-2021

PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

दि. 27.02.2021

प्रति,

मा.संपादक साहेब,

दैनिक ____________

जालना.

आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये खालील बातमी प्रसिध्द करावी हि विनंती

**राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालयात**

**मराठी राजभाषा दिन व संत रविदास महाराज जयंती संपन्न**

जालना दि.27.02.2021 राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविदयालय जालना येथे दि.27.02.2021 रोजी मराठी राजभाषा दिन म्हणून कवि वि.वा.शिरवाडकर यांची जयंती व तसेच संतश्रेष्ठ रविदास महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविदयालयाच्या प्राचार्या डॉ.सुनंदा तिडके यांनी वि.वा.शिरवाडकर यांचे साहित्यावर प्रकाश टाकला. तसेच मराठी राजभाषा दिनाचे महत्व विषद केले. संत रविदास महाराज यांचे जिवन व कार्यावर प्रा.डॉ.शोभा यशवंते यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रमूख पाहुणे प्रा.डॉ.उमेश मुंढे हे होते. सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.डॉ.दादासाहेब गि-हे यांनी व्यक्त केले. यावेळी महाविदयालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विदयार्थी उपस्थित होते.

प्राचार्य

PRINCIPAL

Rashtramata Indira Gandhi Arts

for Science & Commerce College, Jalna